cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२७९ | शनिवार, दि.१ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### नुसती चौकशीच नाहीतर दोषींना शिक्षाही व्हावी !

यागराज येथील महाकुंभमेळ्यात बुधवारी झालेली चेंगराचेंगरी ही खरोखरच दुर्दैवी दुर्घटना आहे. या दुर्घटनेत ३० भाविकांचा मृत्यू झाला. या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याचा आदेश उत्तर प्रदेश सरकारने दिला आहे. ही घटना ज्या परिस्थितीत घडली, तिचा विचार करता सखोल चौकशी आवश्यकच ठरते. महाकुंभासारख्या महोत्सवात कोट्यावधी नागरिक एका स्थानी येतात. थोडीशी जरी गडबड झाली तरी अशावेळी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असतेच.

D.S.Nagargoje 8908165555 9175606738
A.S.Nagargoje 9284872700 8007003550
बालाजी बॅटरी हाऊस
सेल्स अॅण्ड सर्व्हीसेस
आमच्याकडे सर्व प्रकारच्या बॅटरी योग्य दरात मिळतील.
पत्ता : काकु-नाना हॉस्पिटल समोर, जालना रोड, बीड.

# शेतकऱ्यांच्या एक खिडकी योजनेसाठी समिती स्थापन

## राज्य सरकारकडे पंधरा दिवसात द्यावा लागणार अहवाल

**मुंबई । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ एक खिडकी योजनेतून देण्यासाठी राज्य सरकारकडून एक शेतकरी अॅप आणि पोर्टल सुरू करण्याची घोषणा राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शिर्डीत केली होती. याच योजनेच्या अॅप आणि पोर्टल निर्मितीसाठी राज्य सरकारने समिती स्थापन केल्याचा शासन निर्णय शुक्रवारी (दि.३१) प्रसिद्ध केला आहे. समितीने या पोर्टलसाठी १५ दिवसांत अभ्यास करून अहवाल राज्य सरकारला सादर करण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले आहेत.**

### योजनांत पारदर्शकता आणण्यासाठी निर्णय

राज्यात कृषी विभागाच्या विविध योजनांमधील गैरव्यवहार समोर येत आहेत. त्यामुळे कृषी विभागाच्या योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने एक खिडकी संकल्पनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

शेतकऱ्यांना दैनंदिन कृषी कामात विविध समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे या समस्यांचे निवारण एकाच ठिकाणी करण्यासाठी कृषी विषयक योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अॅप आणि पोर्टल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या पोर्टलचं नाव अजित पोर्टल असेल अशी घोषणाही कृषिमंत्र्यांनी केली होती. परंतु अद्याप याबद्दलची अधिकृत माहिती समोर आलेली नाही. राज्य सरकारने स्थापन केलेल्या समितीमध्ये पाच सदस्य असून नानाजी



देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक समितीचे अध्यक्ष आहेत. तर बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्पाचे संचालक, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे सेवानिवृत संचालक गोरंटीवार, धाराशिवचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने सदस्य आहेत. स्थापन करण्यात आलेली समिती ◀◀ पान २ वर

## विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी ८ टक्के विकासदराची गरज

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शुक्रवारी संसदेत २०२४-२५ चा आर्थिक सर्वेक्षण अहवाल (२०२५) सादर केला. आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५ मधून, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये भारताचा देशांतर्गत सकल राष्ट्रीय उत्पादनात अर्थात जीडीपी वाढीचा दर ६.३ ते ६.८ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पुढील वर्षी आर्थिक स्थिती मंदावलेली राहील, असाही अंदाज व्यक्त केला आहे. आर्थिक सर्वेक्षणातून देशाच्या आर्थिक स्थितीचे आणि भविष्यातील



दिशेचे संपूर्ण विश्लेषण सादर केले जाते.


सरकारचा जीडीपी अंदाज हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ६.५ टक्के व्याजदराशी सुसंगत असा आहे. पण जागतिक बँकेच्या ६.७ टक्के व्याजदर अंदाजापेक्षा कमी असल्याचे आर्थिक ◀◀ पान २ वर

# राजसत्तेबरोबर धनंजय मुंडेंना धर्मसत्तेचाही आशिर्वाद

## महंत नामदेव शास्त्रींचे मोठे वक्तव्य; धनंजय मुंडे यांच्या पाठीमागे भगवानगड भक्कमपणे उभा

**भगवानगड । प्रतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणात वाल्मिक कराड यांचे नाव घेतले जात असल्याने मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर मोठा दबाव आणण्यात आला. त्यांनी राजीनामा द्यावा यासाठी विरोधक आक्रमक झाले. मात्र खून प्रकरणाशी मुंडेंचा संबंध नसल्याची बाब आणि तपास यंत्रणेवर विश्वास ठेऊन राजसत्तेने मुंडेंना आतापर्यंत तरी दिलासा दिला. आता राजसत्तेबरोबर धनंजय मुंडेंना धर्मसत्तेचाही आशिर्वाद असल्याने ते सध्याच्या संकटातून बाहेर पडतात का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. भगवान गडावर मुक्कामी गेल्यावर महंत नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडेंच्या पाठीशी भगवानगड भक्कमपणे उभा असल्याचे सांगितले.** ◀◀ पान २ वर





### महंत शास्त्रींच्या भुमिकेनंतर वाद

आजचा दिवस धनंजय मुंडे यांच्यासाठी मोठा दिलासादायक असला तरी भगवानगडाची भूमिकाच आता वादात सापडली आहे. मंत्री मुंडे यांचें समर्थन करताना बोलण्याच्या ओघात महंत नामदेव शास्त्री जे काही बोलून गेले, त्यावरून वाद उफाळणे स्वाभाविकच आहे. वारकरी संप्रदायाच्या गादीने राजकीय भाष्य करताना एकतर्फी बाजू घेणे अनेकांना रूचलेले नाही. तशा अनेक प्रतिक्रिया राज्यभरातून उमटत आहे.

### त्यावर मला काही बोलायचे नाही-धनंजय मुंडे


भगवान गड मुक्कामी गेल्यावर महंत नामदेव शास्त्रींनी भुमिका मांडल्यावर धनंजय मुंडे यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'एक लक्षात घ्या. हे संकट आज आलेलं नाही. ५३ दिवसांपासून पाहत आहात. सोशल मीडियातून टार्गेट करून मीडिया ट्रायल सुरू आहे. त्यात कुठेही मी तीन महिन्यात एक अवाक्षर शब्द बोललो नाही. ५३ दिवसात कधीही इथे आलो असतो. पण त्या भावनेतून नाही, मंत्री झाल्यानंतर भगवानगडावर आलं पाहिजे या हेतूने आलो', असे मुंडे म्हणाले. तर जे प्रकरण घडलं. ते ५३ दिवस सुरू आहे. यात सर्व गोष्टी आल्या आहेत. आमचंही स्पष्ट म्हणणं आहे की, देशमुखांची हत्या झाली त्यातील आरोपींना फाशी द्या. फास्ट ट्रॅकवर केस आणा, अशी मागणी त्यांनी पुन्हा केली. यात जे कोणी सापडेल त्याला शासन झालं पाहिजे. ही पहिल्या दिवसांपासूनची भूमिका आहे. ही भूमिका मांडल्यावर काही लोक राजकारण करत असतील, केवळ माझा राजीनामा घेण्यासाठी राजकारण आहे की संतोष देशमुखच्या मारेकऱ्याला फासावर लटकवण्यासाठी राजकारण आहे. एका समाजाला, मला टार्गेट करून फायदा घ्यायचा हा ज्याचा त्याचा विचार आहे. पण जे कोणी दोषी असतील त्यांना फासावर लटकवा हे माझं मत आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले.

### भगवान गडाने कोणाला पाठींबा द्यायचा, हा त्यांचा अधिकार-खा. सोनवणे



महंत नामदेव महाराज शास्त्रींनी काय बोलावे, काय प्रतिक्रिया द्यावी हा अधिकार त्यांचा आहे. त्यामुळे त्यासंदर्भात काही टीका करण्यापेक्षा मुंडे कुटुंबीयांला भगवान गडाचा पाठिंबा आहे हे वारंवार महंत नामदेव महाराज शास्त्री यांनी सांगितलेले आहे. त्यामुळे भगवान गडाने कोणाला पाठिंबा द्यायचा हा त्यांचा अधिकार आहे त्यावर मी काय बोलणार?, असे खासदार बजरंग सोनावणे यांनी एका वृत्तवाहीनीशी बोलताना म्हटले आहे.

### १०० टक्के सांगतो हा खून धनंजय मुंडे यांनी केलेला नाही-जितेंद्र आव्हाड



मी शंभर टक्के सांगतो खून धनंजय मुंडे यांनी केलेला नाही. पण ते निर्दोष नाहीत या गँगला पोसण्याचे काम, राजकीय राजाश्रय देण्याचे काम त्यांनी कळत न कळत केले आहे, असा आरोप आ. जितेंद्र आव्हाड यांनी केला. आदरणीय माणसांनी आपल्या शब्दांना मर्यादा द्याव्यात. त्यांनी संतोष देशमुख यांच्या बद्दल केलेले वक्तव्य अत्यंत दुर्दैवी आहे, असे आव्हाड म्हणाले.

### संतोष देशमुखांचे कुटुंब रविवारी नामदेव शास्त्रींकडे पुराव्यांची फाईल देणार

धनंजय मुंडे गुन्हेगार नाहीत, त्यांच्या पाठीशी भगवानगड भक्कमपणे उभा आहे'', असे वक्तव्य भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी केले होते. त्यानंतर आता दिवंगत संतोष देशमुख यांचे कुटुंब रविवारी (दि.२) भगवानगडावर जाऊन महंत नामदेव शास्त्री यांची घेणार भेट घेणार आहे. यावेळी देशमुख कुटुंबिय पुराव्यांची फाईल नामदेव शास्त्रींकडे सुपूर्द करणार आहेत. बीडमध्ये बैठक घेवून धनंजय देशमुख सह कुटुंब जाणार भगवान गडावर जाणार आहेत.

# २०२४ मध्ये पीक विम्याखालील क्षेत्रात ११ टक्के वाढ

## आर्थिक सर्वेक्षण अहवालाची आकडेवारी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शुक्रवारी (दि.३१) आर्थिक सर्वेक्षण अहवाल संसदेत सादर केला. देशातील कृषी क्षेत्राची अवस्था गंभीर असतानाही कृषी क्षेत्रात २०२४-२५ दुसऱ्या तिमाहीत कृषी विकास दर ३.५ टक्के राहिल्याचं चित्र आर्थिक सर्वेक्षण अहवालात रंगण्यात आले आहे. तसेच उत्पादनातील वाढ, बहूपीक पद्धती आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढल्यामुळे कृषी विकास दर स्थिर असल्याचा दावाही आर्थिक सर्वेक्षणात करण्यात आला आहे. तर पीकविमा योजनेत शेतकऱ्यांचा सहभाग ऐतिहासिक उच्चांकी पातळीवर पोहचल्याचा दावा अहवालात करण्यात आला आहे.

आर्थिक वर्ष २०२४ मध्ये २४ राज्यांनी पंतप्रधान पीकविमा योजनेत सहभाग घेतला. तर विमा कंपन्यांची संख्या १५ वर पोहचली आहे. यापूर्वी २०२०-२१ या योजनेत २० राज्य आणि ११ कंपन्यांचा समावेश होता. २०१६ साली केंद्र सरकारने पीकविमा योजना सुरू केली. परंतु या योजनेत काही राज्य बाहेर पडली होती. बाहेर पडलेली राज्य आता पुन्हा केंद्राच्या योजनेत सहभागी होत आहेत, असे अहवालात सांगण्यात आले आहे. पीकविमा योजनेतील तांत्रिक सुधारणामुळे शेतकऱ्यांच्या प्रीमियम दरात ३२ टक्के घट झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी प्रीमियम भरावा लागत असल्याने, २०२४ मध्ये ४ कोटी शेतकऱ्यांनी योजनेत नाव नोंदणी केली. २०२३ च्या तुलनेत ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३१ जानेवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक : आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.०० क्विंटल | २,८५१ | २,८५१ | २,८५१ |
| ज्वारी/हायब्रिड :१६.५० क्विंटल | १,९५० | २,३६० | २,१३५ |
| मका/लोकल:१५.५० क्विंटल | २,१०३ | २,१०३ | २,१०३ |
| तूर : २०६.५० क्विंटल | ६,७३६ | ७,२२२ | ७,०४२ |
| उडीद : ८.०० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ३.५० क्विंटल | २,४६८ | २,४६८ | २,४६८ |
| मुग : २.५० क्विंटल | ७,१४० | ७,२०० | ७,१७० |
| सोयाबीन: ११९.५० क्विंटल | ३,८०० | ४,०५० | ३,९४१ |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ४,८०१ | ५,५०१ | ५,१५१ |

# वाळू माफियांना सहकार्य करणारे गेवराईचे दोन पोलिस निलंबित

**बीड । प्रतिनिधी**

**अवैध वाळू उपसा केल्याप्रकरणी आरोपींशी साठेलोटे करणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. हे दोन्ही पोलिस कर्मचारी बीडच्या गेवराई पोलिस ठाण्यातील आहेत. सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलिस हवालदार अशोक हंबर्डे अशी निलंबनाची कारवाई करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. बीडचे नवनियुक्त पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.**

सहाय्यक फौजदार बलराम सुतार आणि पोलिस हवालदार अशोक हंबर्डे यांना वाळूच्या दोन ट्रॅक्टरवर कारवाईचे आदेश देण्यात आले होते, तसेच वाळूसह गाडी देखील ताब्यात घेण्यास सांगितले होते. मात्र, त्यांनी वाळूसह गाडी ताब्यात न घेता केवळ वाहन ठाण्यात आणून लावले. तसेच गुन्हा दाखल करण्यास देखील विलंब केला. हा प्रकार म्हणजे आरोपींना सहकार्य करण्याचा होता. यामुळे पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांनी बलराम सुतार आणि अशोक हंबर्डे या दोन्ही कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीडमध्ये अवैध वाळू, राख तसेच खंडणी असे अनेक गुन्हे उघडकीस येत आहेत. ◀◀ पान २ वर

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते साहित्य संमेलनाच्या कार्यालयाचे उद्घाटन

## दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**नवी दिल्लीमध्ये होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्ली येथे सांगितले. दिल्लीत २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ दरम्यान होणारे साहित्य संमेलन यशस्वी होईल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.**

कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील साहित्य संमेलनासाठीच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, दिल्लीत होणारे साहित्य संमेलन निश्चित भव्य असे होईल. हे संमेलन देश नव्हे, तर जगभरातील मराठी



माणसांकरिता अभिमानास्पद ठरेल. साहित्य संमेलनाचे आयोजन यशस्वी व्हावे यासाठी विविध यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर दिल्लीत होणाऱ्या या संमेलनास विशेष महत्व आहे. राजधानीत होणाऱ्या साहित्य संमेलनाबाबत मराठी साहित्यिक उत्सूक ◀◀ पान २ वर

# राष्ट्रपतींविषयी आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल सोनिया गांधी, राहुल गांधींनी माफी मागावी - भाजप




**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या भाषणावर काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी केलेल्या टिप्पणीमुळे चांगलेच वादळ उठले. भाजपने सोनिया गांधींच्या वक्तव्यावर आक्षेप घेत त्यांचे विधान काँग्रेसच्या सरंजामी विचारसरणीचे, अहंकाराचे आणि आदिवासी समुदायातून येणाऱ्या राष्ट्रपतींबद्दलच्या त्यांच्या निराशेचे प्रतिबिंब आहे. राष्ट्रपतींविरुद्धच्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल सोनिया गांधी आणि राहुल गांधींसह काँग्रेस पक्षाने माफी मागितली पाहिजे, अशी मागणी केली.**

संसदेच्या अर्थसंकल्पयीय अधिवेशनाला शुक्रवारपासून सुरुवात झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अभिभाषण केले. या अभिभाषणावर काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी केलेल्या वक्तव्याचे जोरदार पडसाद उमटत आहेत. राष्ट्रपतींच्या संसदेतील अभिभाषणानंतर संसद परिसरात सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी आपसात बोलत होते. यावेळी उपस्थित पत्रकारांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर सोनिया गांधींना प्रश्न विचारले. सोनिया गांधींना प्रश्न विचारताच राहुल गांधींनी राष्ट्रपतींच्या भाषणाला कंटाळवाणे ◀◀ पान २ वर

# गुणरत्न सदावर्तेंचा सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप

## गुंड्या गायकवाडच्या रक्ताला किंमत नव्हती का?





**मुंबई । प्रतिनिधी**

**जितेंद्र आव्हाड साहेबांनी गुंड्या गायकवाड साहेब जे मागासवर्गीय होते यांची हत्या झाली त्यांच्यावर बोलायचे. अगोदर झालेले खून काय खून नव्हते का? त्यातून काय रक्त निघत नव्हते का? त्या रक्ताला काय किंमत नव्हती? असा सवालही गुणरत्न सदावर्ते यांनी केला.**

ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांनी भटक्या विमुक्त समाजातील आदिवासी मागास समाजातील गुंड्या गायकवाड यांच्या हत्येबद्दल प्रश्न उपस्थितीत केले आहेत. यावेळी गुणरत्न सदावर्ते यांनी आमदार सुरेश धस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. 'हा देश संविधानावर चालतो. ◀◀ पान २ वर

### टॉम अॅण्ड जेरी पाहत नाही-आ. सुरेश धस

गुणरत्न सदावर्ते यांनी केलेल्या आरोपाबाबत माध्यम प्रतिनिधीने प्रश्न विचारला असता आ. सुरेश धस यांनी प्रश्नाला बगल देत टॉम अॅण्ड जेरी पाहत नाही, असे सांगितले.

### धस यांच्या कुटुंबाचा सहभाग?

सुरेश धस यांच्या पत्नीने तीन लाख रुपये पाठवले होते, ती रक्कम जप्त होते. केंद्र हे तपासातील अधिकारी ते मेन विटनेस आहेत. ते डंके की चोट पे सांगत आहेत धस यांना आज देशमुख प्रकरणावर बोलण्यासाठी तोंड राहिलेले नाही. धस कोण आहेत हे मराठा समाजाचे आहेत. उच्च जातीचे आहेत. ते तत्कालीन मंत्री होते हे काहीही मायने राखत नाही. त्यांच्या कुटुंबाचे इन्व्हॉलमेंट गुंड्या गायकवाड मर्डर केसमध्ये असेल तर बाबतीत पूर्णपणे छडा लागला पाहिजे, अशी मागणी गुणरत्न सदावर्ते यांनी केली.

cmyk

## अग्रलेख

# नुसती चौकशीच नाहीतर दोषींना शिक्षाही व्हावी !

यागराज येथील महाकुंभमेळ्यात बुधवारी झालेली चेंगराचेंगरी ही खरोखरच दुर्दैवी दुर्घटना आहे. या दुर्घटनेत ३० भाविकांचा मृत्यू झाला. या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याचा आदेश उत्तर प्रदेश सरकारने दिला आहे. ही घटना ज्या परिस्थितीत घडली, तिचा विचार करता सखोल चौकशी आवश्यकच ठरते. महाकुंभासारख्या महोत्सवात कोट्यावधी नागरिक एका स्थानी येतात. थोडीशी जरी गडबड झाली तरी अशावेळी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असतेच. अनेकदा तसे घडलेले आहे. प्रयागराज येथील दुर्घटना कशी घडली, यासंबंधी बऱ्याच शक्यता व्यक्त केल्या जात आहेत. अफवा पसरविल्याने लोकांचा गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरी झाली, या कारणाची मोठी चर्चा होत आहे. दुर्घटनेच्या स्थानी असणारे पाच अधिकारी उत्तरदायी आहेत, असेही वृत्त काही प्रसारमाध्यमांनी प्रसारित केले आहे. हे वृत्त खरे असेल, तर त्यांची कसून चौकशी होणे आवश्यक आहे. एका अधिकाऱ्याने येण्याजाण्याचे मार्ग असणारे सेतू (पूल) बंद केले आणि अन्य एका अधिकाऱ्याने मध्यरात्री झोपेत असलेल्या भाविकांना जागे करुन चेंगराचेंगरी होणार असल्याचा इशारा दिला. त्यामुळे लोकांची गडबड उडाली आणि त्यामुळे हा प्रसंग ओढवला, असेही वृत्त काही माध्यमांनी दिले आहे.

हा अपघात असेल तर त्याची कारणे कोणती हे शोधले पाहिजे. तसेच घातपात असेल तर त्याची पाळेमुळे खणून काढून त्याला कारणीभूत असणाऱ्यांना कठोरातील कठोर शिक्षा त्वरित मिळवून देणे, हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. अशा प्रचंड गर्दीच्या स्थानी जाणाऱ्यांनीही काही पथ्ये पाळणे आवश्यक असते. अफवांना बळी पडून स्वत:च गोंधळ करुन न घेता शांतपणे हालचाली केल्यास स्थिती नियंत्रणात राहू शकते आणि हानी टाळता येते किंवा कमीतकमी राखता येते. प्रशासनाने स्पष्ट केलेले नियम पाळणे अत्यंत महत्त्वाचे ठरते, असे या प्रसंगाच्या संदर्भात बोलले जात आहे. अर्थात, नियम पाळूनही कित्येकदा अशा घटना टाळता येत नाहीत, ही बाबही खरीच आहे. तसेच अशा स्थितीत सर्वसामान्यांचा फारसा दोष नसतो कारण अफवा कोणत्या आहेत आणि खरी स्थिती काय आहे, हेच कित्येकदा समजू शकत नाही. ते समजून घेण्याइतका वेळही मिळत नाही. आपला जीव वाचविण्यासाठी प्रत्येकजण धडपड करायला जातो आणि त्यातून गोंधळ निर्माण होतो.

गेल्या ७५ वर्षांमध्ये कुंभमेळ्यांमध्ये चार-पाचवेळा अशा दुर्घटना घडल्या आहेत आणि अनेक भाविकांना प्राणांस मुकावे लागले आहे. यंदाचा महाकुंभाचा योग १४४ वर्षांनंतर प्रथमच आला आहे. त्यामुळे ही पर्वणी साधण्यासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या अतिप्रचंड आहे. ही स्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने योग्य व्यवस्था ठेवण्याचा प्रयत्न केला आहे, हेही एकंदर आढावा घेता दिसून येत आहे. पण कित्येकदा प्रशासनाचेही प्रयत्न तोकडे पडतात. प्रचंड संख्येसमोर व्यवस्था अपुरी पडते. मुस्लीमांसाठी अत्यंत पवित्र असणाऱ्या हाजच्या यात्रेतही अशा दुर्घटना अनेकदा झालेल्या आहेत. पण प्रत्येक दुर्घटनेच्या करणांचा शोध घेऊन पुढच्या वेळी त्या त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करण्याचे काम प्रशासनाकडून होणे आवश्यक आहे. त्यामुळे बुधवारच्या या दुर्घटनेची चौकशी करुन खऱ्या कारणांचा शोध घ्यावा आणि जर हेतुपुरस्सर असे घडविण्यात आले असेल तर, 'एक घाव, दोन तुकडे' या पद्धतीने अशा समाजकंटकांवर किंवा दहशतवाद्यांवर कठोर कारवाई करावी, अशी लोकांची अपेक्षा आहे. हा अपघात असेल, तर त्याची कारणे शोधून ती जनतेसमोर स्पष्टपणे मांडली पाहिजेत. कारण, अशा दुर्घटना घडत असल्या, तरी त्या आपोआप घडत नाहीत. काही ना काही त्रुटी राहून गेलेली असतेच. तेव्हा, अशा घटनांचे राजकारण न करता त्याच्यातून भविष्यकाळासाठी धडा शिकणे आवश्यक आहे.

हा महाकुंभमेळा आणखी महिनाभर चालणार आहे. या कालावधीत तरी या दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, याची दक्षता बाळगणे प्रशासन आणि भाविक या दोघांसाठीही आवश्यक आहे. सुदैवाने, बुधवारच्या घटनेची व्याप्ती फार मोठी नव्हती. पण यामुळे प्रशासनाने आपली पाठ थोपटून घ्यावी, अशी परिस्थिती नाही. कारण अद्याप किमान महिनाभर प्रशासनाला डोळ्यात तेल घालून काम करावे लागणार आहे. तसेच भाविकांनीही सर्व भार केवळ प्रशासनावर न टाकता, नियमांचे काटेकोर पालन करणे आणि कोणतीही हालचाल सुरक्षितपणे करण्याची आणि विनाकारण धोका न पत्करण्याची आवश्यकता आहे. प्रशासन आणि भाविक यांनी एकमेकांना सहकार्य केल्यास निश्चितपणे पुढचा एक महिना विनाअडथळा आणि सुलभतेने हा महाकुंभमेळा पार पडणे शक्य आहे.

# जाती तोडा समाज जोडा हा वारकरी संप्रदायाचा मूलमंत्र जपणे काळाची गरज– माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**आजच्या कलोशीत झालेल्या समाज मनाला एकत्रित करण्याचे काम पारंपारिक काळापासून वारकरी संप्रदायाने केले आहे जातीपातीला थारा न देता सर्व समाज बांधवांना एकाच छत्र छायेखाली आणण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले आहे ।।ज्ञानदेवे रचिला पाया, उभारिले देवालया, नामा तयाचा किंकर, त्याने रचिले हे आवर, मा उक्तीप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी उभा केलेल्या वारकरी संप्रदायाचा विस्तार संत नामदेव महाराज, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत चोखामेळा, संत जनाबाई आदी संतांनी केला आहे, जाती तोडा समाज जोडा हा वारकरी सांप्रदायाचा मूळ मंत्र जपणे हीच आता काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.**

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त आयोजित अखंड



हरिनाम सप्ताह मध्ये ह.भ.प.अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित राहून मठाधिपती ह.भ.प.शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले, यावेळी उपस्थित भाविकांना संबोधित करताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गोरक्षनाथ टेकडीच्या विकासासाठी आपण कटीबद्ध असून आतापर्यंत ९ कोटींची कामे झाली असून मेणार्या काळात रस्ता, फरशी आणि कंपाउंड कामासाठी आपण प्रयत्न करणार आहोत, आजच्या काळात संत महतांच्या विचाराप्रमाणे वागण्याची गरज असून संतांच्या कार्यामुळे लोहचुंबकाप्रमाणे माणसे एकत्रित करण्याचे महत्त्वपूर्ण काम होऊ लागले आहे. या गडाच्या विकासासाठी सत्ता असो अथवा नसो आपण सतत प्रयत्नशील असून जाणीवपूर्वक विकास कामे करण्यावर आपण भर दिलेला आहे. गडाच्या भक्तांकडून वारंवार होणार्या मागणीचा विचार करून यासाठी आपण प्रमत्न करत असतो मनात भाव ठेवून कुठलेही भक्ती करा गोरक्षनाथ टेकडीचा भाविक-भक्त मोठ्या प्रमाणात आहे. वैकुंठवासी किसन बाबा मांनी अखंडपणे सुरू केलेली ही परंपरा मठाधिपती नवनाथ बाबा यांनी कायम ठेवली असून दरवर्षी मोठ्या प्रमाणात सप्ताह साजरा करत असतात आणि परिसरातील भक्तांना एकत्रित करून घेतात. या ठिकाणी जात पात धर्म कुठलाही भेद न ठेवता सर्व जाती धर्मातील भाविकांना एकत्रित केले जाते. बीड जिल्ह्याची ही परंपरा मोठी आहे वारकरी सांप्रदाय हे बीड जिल्ह्याचे वैभव असून ते टिकवण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करणे गरजेचे आहे. या ठिकाणी असलेल्या रस्त्याची समस्या फरशी आणि कंपाउंड यासाठी प्रस्ताव देऊन तो मंजूर करून आणू असेही ते म्हणाले. यावेळी ह.भ.प.शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज, ह.भ.प.अखंडानंद गिरी महाराज, माउली महाराज वडवणीवर, माजी मंत्री बदामराव पंडित, माऊली महाराज बेदरकर, गंगाधर घुमरे, अरुण डाके, सखाराम मस्के, अरुण लांडे, हनुमान देवकते, नारायण देवकते, दादासाहेब लांडे, बंडू गाडीवान, चंद्रकांत फड, जनार्दन जोगदंड, बाबुराव करांडे, दिनकर लांडे, कांतराव डोईफोडे, सुनील थोरात, रामा भोगे, सोमनाथ माने, ओमप्रकाश खवतड, शाम काकडे, कैलास देवकते, नागेश शिंदे, बंडू लांडे, परमेश्वर थापडे यांच्यासह परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये बालगोपाळांची भरली यात्रा

**मानूर । प्रतिनिधी**

शिरूर शहरातील मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये शालेय विद्यार्थ्यांची शुक्रवारी जत्रा भरली होती.या यात्रेत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांची पालकांनी खरेदी करत चव चाखली.आपल्याच मुलांनी तयार केलेल्या विविध रुचकर आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थांची पालकांनी मोठ्या आवडीने खरेदी केल्यामुळे त्यांच्या पाल्यांचा आनंद गगनात मावत नव्हता.शिवाय खरेदी विक्रीचे व्यवहार ज्ञान या जत्रेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शिकायला मिळाले.शालेय जीवनात मुलांना कमी वयात शिक्षणासह व्यावहाराची गोडी निर्माण व्हावी असा या फन फेअर उपक्रमाचा उद्देश असल्याचे शाळेचे संस्थापक तथा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी सांगितले.या फन फेअर मध्ये मॉडर्न इंग्लिश स्कूल मधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत जवळपास अठरा वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते.सदरील उपक्रम राबविण्यासाठी शाळेचे प्राचार्य प्रकाश नागरे यांच्यासह अक्षय यादव,कृष्णा उटे,निता पवार,संध्या पवार,पूजा धारवाडकर,तैमुना शेख, सादिया शेख,जयश्री सप्रे,उज्वला सानप,अनिषा टेटे,पूनम टोपनो,अजय पावशे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## हमीदखान पठाण यांना गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार



पाटोदा । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने आज सेलू येथे आदर्श तालुका आणि आदर्श जिल्हा पत्रकार संघ पुरस्कारांचे वितरण होणार आहे.. त्यानिमित्त पुणे ते सेलू अशी पत्रकार एकता रँली काढण्यात आली आहे . यावेळी पाटोदा येथे परिषदेचे विश्वस्त देशमुख सरसह वरिष्ठांच्या वतीने हमीदखान पठाण यांना गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

या रॅलीत रांजणगाव, नगर, आष्टी, जामखेड, पाटोद्यात आल्यानंतर शासकीय विश्रामगृहात परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुखसह येणाऱ्या पाहुण्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे पाटोदा तालुका सचिव हमीदखान पठाण यांना गंगाई -बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख. करण्यात आले मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख, परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पाबळे, सुनिल लोणकर, जिल्हाध्यक्ष पुणे, गणेश मोकाशे उपाध्यक्ष परिषद, सुनिल वाळुंज, तात्या भरत निगडे. सतिश गर्जे

## सुरेशराव दिवटे यांचा सेवापुर्ती सोहळा संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

शुक्रवार दि.३१ जानेवारी २०२५ रोजी चौंडेश्वरी मंदिर येथे एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाचे लिपीक सुरेशराव दिवटे यांचा सेवापुर्ती सोहळा निमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष एकात्मिक बालविकास विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती म्हेत्रे चंद्रकला मॅडम, प्रमुख पाहुणे विस्तार अधिकारी नरसाळे साहेब, कनिष्ठ सहाय्यक खाडे साहेब, सुपर वाझर श्रीमती मस्के मॅडम,श्रीमती खाडे मॅडम ,प्रमुख अतिथी म्हणुन नगराध्यक्ष शेषराव जगताप, उपाध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी.जि.प.सदस्य नवनाथराव म्हेत्रे, सर्जेराव महाराज आळणे, माजी संरपच वरवडे आण्णा, नगरसेवक नागेशराव डिगे, हरिदास टकले, भिमराव उजगरे, माजी सभापती दिनकर आंधळे ,बाबुशेठ नहार , सुनील ढोले, नारायण डिगे, विनायक मुळे,महादेव झाडे व वडवणी तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस कर्मचारी इतर मान्यवर उपस्थित होते. सत्कारमूर्ती सुरेशराव दिवटे व त्यांच्या सपत्नीक यांचा शाल व श्रीफळ देऊन एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या वतीने सर्व कर्मचारी यांनी सत्कार केला. यावेळी प्रकल्प अधिकारी श्रीमती म्हेत्रे मॅडम यांनी सत्कार मुर्ती आमचे कार्यलायचे लिपीक सुरेश आण्णा हे गेल्या वडवणी ग्रामपंचायत कार्यालयात २५ वर्षे लिपिक म्हणून त्यांनी काम केले, तसेच आपल्या एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाचे लिपीक म्हणून १७ वर्षे त्यांनी एक प्रामाणिक पणे काम केले. सुरेश आण्णा हे अतिशय मनमिळावू व्यक्ती असून आपल्या अत्यंत तरबेज व वेळेवर निर्णय क्षमता असून आशा व्यक्ती ची गरज आवश्यकता आहे.असे मत श्रीमती म्हेत्रे मॅडम यांनी केले.ना सेवानिवृत्ती हा जीवनाचा आणखी एक नवीन अध्याय आहे.

## भोकरदन तहसीलदार विरोधात हक्क भंगाचा प्रस्ताव दाखल करणार–खा.काळे

**जालना । पतिनिधी**

**श्री गणपती संस्थान, राजुर, ता. भोकरदन, या अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व श्री संत नामदेव महाराज चरित्र कथाचे शनिवार, दिनांक २५.०१.२०२५ ते शनिवार, दिनांक ०१.०२.२०२५ या कालावधीत आयोजन करण्यांत आलेले आहे. या कार्यक्रमाची पूर्वकल्पना मला देण्यांत आली नव्हती. तसेच कार्यक्रम पत्रिकेत प्रोटोकॉलप्रमाणे नावाचा समावेश करण्यांत आला नाही ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. परंतु आपण त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. असे जालना जिल्ह्याचे खासदार डॉ. श्री कल्याण काळे यांच्या निदर्शनात आले आहे म्हणून भोकरदन तहसीलदार यांचे विरोधात हक्क भंगाच्या प्रस्ताव व दाखल करण्यात येणार आहे.**



लोकप्रतिनिधी कायद्याचे आपण उल्लंघन केलेले आहे. आपली हो वर्तणूक जालना लोकसभा मतदारसंघाचा सदस्य या नात्याने लोकप्रतिनिधीचा सन्मानाची वागणूक देणे हे आपल्या कर्तव्याचा भाग असतांना देखील अशा प्रकारचे बेजबाबदार वर्तन करून माझा व माझ्या लोकसभा सदस्यात्वावा तसेच मतदारसंघाचा जाणिवपुर्वक अवमान केला आहे. नालना लोकसभा मतदारसंघाचा लोकप्रतिनिधी म्हणून संसदीय लोकशाहीमध्ये माझे कर्तव्य, जबाबदारी य अधिकार आहेत. मात्र आपल्या अशा वागण्याने माझ्या कर्तव्यात, हक्कात, अधिकारात तसेच कामात अडथळा निर्माण झाला आहे. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. विमंस २०१३/प्र.क्र.६७/१८ (र.व का.), दिनांक २७.०७.२०१५ व सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. विमंस-२०१३/प्रक्र.६७ /१८ (र.व का.), दिनांक १७.०१.२०१४ अन्वये विधानमंडळ संसद सदस्याला अशाप्रकारे दुर्लक्षित करणे, सन्मानपूर्वक वागणुक न देणे ही बाब एक प्रकारे लोकसभा सदस्याचा हक्कभंग करणारी आहे. आपल्या विरोधात विशेष हक्कभंग समितीकडे हक्कभंगाचो कारवाई करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणार आहे. तरी आपण उपरोक्त प्रकरणी ४८ तासात तात्काळ व्यक्तीशः खुलासा सादर करावा. आपण खुलासा सादर न केल्यास आपले कोही म्हणणे नाही असे गृहीत धरून आपणांवर हक्कभंगाची कारवाई करण्यासाठी प्रस्ताव दाखल करणार आहे. खासदार कल्याण काळे यांनी मा. जिल्हाधिकारी यांना माहितीस्तव कळविले आहे.

## पान १ वरून...

### विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी

सर्वेक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या दोन तिमाहीत देशाच्या अर्थव्यवस्थेची गती काहीशी मंदावलेली दिसून आली. या पार्श्वभूमीवर आर्थिक सर्वेक्षणात असे म्हटले आहे की, विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारताला एक अथवा दोन दशकांपर्यंत सुमारे ८ टक्के विकास दर गाठावा लागेल.

---------------

### शेतकऱ्यांच्या एक खिडकी

कृषी विभागाच्या योजनांची माहिती घेणार आहे. तसेच कृषी विभागाच्या कोणत्या योजनेतून कोणत्या घटकाला वा लाभार्थीला लाभ दिला जातो, याची माहिती घेणार आहे. तसेच या ॲप आणि पोर्टलची आखणी करण्याची जबाबदारी समितीवर आहे. त्यासाठी कृषी विभागाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प. महाॲग्रीडीबीटी, ॲग्रीस्टँक, केंद्र सरकारच्या विस्तार प्रकल्पाचा समिती अभ्यास करणार आहे. शेतकऱ्यांना पीक पाहणी, हवामान, बाजारभाव आणि सध्या उपलब्ध यंत्रणेचा अभ्यास करून पोर्टलचा इंटरफेस तयार करण्यात येणार आहे.

------------

### राजसत्तेबरोबर धनंजय मुंडेंना

गेल्या काही दिवसांपासून राज्यात बीडचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर चर्चा सुरू आहे. अशातच मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर चारही बाजूंनी आरोप होत असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. अशातच नुकतीच जिल्हा नियोजन समितीची बैठक झाल्यानंतर मंत्री धनंजय मुंडे हे लागलीच भगवानगडावर पोहोचले आणि ते मुक्कामी होते. यावेळी महंत नामदेव शास्त्री यांची भेट घेत मुंडेंनी सध्या सुरू असलेल्या घडामोडींवर चर्चा केली. यानंतर भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. मुंडेंवर होणाऱ्या आरोपांवर बोलताना ते म्हणाले, 'मंत्री धनंजय मुंडे हे गुन्हेगार नाही. धनंजय मुंडे यांच्या पाठीमागे भगवानगड भक्कमपणे उभा आहे. धनंजय मुंडे यांच्यावरील आरोप झाल्याने संप्रदयाचे नुकसान आहे. पक्षाचे जे नेते आहेत त्यांना देखील याची जाणीव आहे. मात्र ज्या पद्धतीने सध्याचं राजकारण सुरू आहे. हा विषय इतका ताणला जातोय. पण कोणता विषय किती ताणायचा हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे' तर पुढे ते असेही म्हणाले, ज्यावेळी घर फुटले तेव्हा धनंजय मुंडेंनी खूप सोसले आहे. आता उंच उडाण घेत असताना गेल्या ५३ दिवसात धनंजय मुंडेंची मानसिक अवस्था कशी आहे? ते भगवान गडावर आले असले तरी हातावर सलाईन आहे. किती सहन करावे एखाद्याने असे म्हणत धनंजय मुंडे यांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात आहे, असे महंत नामदेव शास्त्री म्हणाले. मंत्री धनंजय मुंडे यांचा सुरुवातीपासूनच आ. प्रकाश सोळंके, आ. सुरेश धस, आ. जितेंद्र आव्हाड, आ. संदिप क्षीरसागर, खा. बजरंग सोनवणे, अंजली दमानिया यांनी राजीनामा मागितला होता. मोठ्या प्रमाणात आरोप करीत त्यांना कैचीत पकडण्याचे काम विरोधकांकडून केले जात होते. तरीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मात्र धनंजय मुंडे आणि तपास यंत्रणेवर विश्वास ठेवला. त्यामुळे आता राजसत्तेबरोबर धर्मसत्तेचाही धनंजय मुंडे यांना आशिर्वाद मिळाला आहे. त्यामुळे ते या संकटातून सहीसलामत बाहेर पडतात का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**याचाच अर्थ ते कराडला वाचवत आहेत–नरेंद्र पाटील**

भाजप नेते आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी धनंजय मुंडे यांना घरचा आहेर दिला आहे. एवढं सर्व प्रकरण झालेले असताना धनंजय मुंडे हे कराडच्या परळी येथील कार्यालयात जाऊन गाठीभेटी घेत होते. याचा अर्थ धनंजय मुंडे हे वाल्मिक कराडला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, असे सांगत नरेंद्र पाटील यांनीही धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. महंत नामदेव शास्त्रींच्या भुमिकेवर बोलताना पाटील म्हणाले, कुणाला क्लीनचिट द्यायची आणि नाही हा महंतांचा वैयक्तिक प्रश्न आहे.

----------

### मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते

असून हे संमेलन विचारप्रवर्तक ठरेल, साहित्य संमेलनासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना निमंत्रित केल्याचे सांगितले. दिल्लीतील विविध मराठी मंडळाच्यावतीने मुख्यमंत्री फडणवीस यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी दिल्लीत अनेक वर्षापासून राहत असलेल्या मराठी लोकांनी मुख्यमंत्री यांच्याकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या. मुख्यमंत्री यांनी याबाबत सकारात्मकता दर्शविली असून दिल्लीतील मराठी मंडळांसाठी आणि येथील वास्तूंसाठी निश्चित योग्य ती पाऊले उचलली जातील, असे आश्वासन दिले.

-------------

### वाळू माफियांना सहकार्य करणार

त्यातच वाळू माफियाचा मुद्दा चांगलाच चर्चेत असताना अवैध वाळू तस्करी करणाऱ्यांना दोन पोलिस कर्मचाऱ्यांना सहकार्य केल्याचे निदर्शनास आल्यावर पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

-------------

### २०२४ मध्ये पीक विम्याखालील

पीकविमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या २६ टक्के अधिक आहे. त्यामुळे २०२४ मध्ये ६०० लाख हेक्टर क्षेत्र विम्याखाली आले, जे की, २०२३ मध्ये ५०० लाख हेक्टर होते. म्हणजेच १९ टक्के जास्त क्षेत्र पीक विम्याखाली आल्याचा आर्थिक सर्वेक्षण अहवालात दावा केला आहे. केंद्र सरकार नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांचं नुकसान झालं तर भरपाई देण्यासाठी पीकविमा योजना राबवतं. शेतकरी नोंदणीच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा आणि प्रीमियमसाठी जगातील तिसऱ्या क्रमांकाची योजना असल्याचं सर्वेक्षण अहवालात सांगण्यात आले आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ मिळत आहे. तसेच अलीकडेच योजनेत येस टेक, विंडस आणि क्रॉप आयसी २८ तंत्रज्ञान लॉच केले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांना वेळेत नुकसान भरपाई मिळत नाही. तसेच या योजनेतुन पिक विमा कंपन्यांची उखळ पांढरी केली जात असल्याचा आरोप केला जातो. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकरी भरपाईपासून वंचित राहतात. परिणामी या योजनेत पारदर्शकता आणण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

------------

### गुणरत्न सदावर्तेंचा सुरेश धस

कोणाची जात उच्च आणि नीच आहे, अशी कोणतीही तरतूद या संविधानामध्ये नाही. आरोपी हा आरोपी आहे, मग तो कोणीही असो कोणत्याही जाती धर्माचा असो आरोपी हा आरोपी असतो. भटक्या विमुक्त समाजातील आदिवासी मागास समाजातील गुंड्या गायकवाड साहेब यांचा जो खून झाला, हे प्रकरण बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणापेक्षा देखील गंभीर आहे. कशाप्रकारे हत्यारे तयार करण्यात आली ते धस यांचे शेत होते का?'' असा सवाल गुणरत्न सदावर्ते यांनी केला आहे.

-------------

### राष्ट्रपतींविषयी आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल सोनिया

म्हटले. ते म्हणाले की राष्ट्रपती जुन्याच गोष्टी पुन्हा सांगत आहेत. यानंतर सोनिया गांधी म्हणाल्या की, ''शेवटी राष्ट्रपती खूप थकल्यासारख्या होत होत्या. त्यांना बोलूही शकत नव्हत्या, बिचाऱ्या... (पुअर लेडी)'' केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते धर्मेंद्र प्रधान यांनी सोनिया गांधींच्या या वक्तव्यावर आक्षेप घेतला. धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी केलेली विधाने अत्यंत निषेधार्ह आहेत. हे विधान काँग्रेसच्या सरंजामी विचारसरणीचे, त्यांच्या अहंकाराचे आणि आदीवासी समुदायातून येणाऱ्या राष्ट्रपतींबद्दलच्या त्यांच्या निराशेचे प्रतिबिंब आहे. काँग्रेसची विचारसरणी नेहमीच एससी-एसटी-ओबीसी विरोधी राहिली आहे. काँग्रेसने पुन्हा एकदा तीच विचारसरणी दाखवली आहे. दलित, वंचित आणि मागासलेल्या समाजातील लोक देशातील सर्वोच्च पदांवर विराजमान होत आहेत, हे काँग्रेस नेत्यांना सहन होत नाही. काँग्रेसने केवळ आदिवासी समुदायाचाच अपमान केला नाही तर देशातील सर्वोच्च संवैधानिक पदाचाही अपमान केला आहे, एका महिलेचा अपमान केला आहे, ओडिशाचा अपमान केला आहे. राष्ट्रपतींविरुद्धच्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल सोनिया गांधी आणि राहुल गांधींसह काँग्रेस पक्षाने माफी मागितली पाहिजे, असेही ते म्हणाले.

**CHANGE IS NAME**

I have changed my name from **GOVIND LAXMAN SHELKE** to **GOVIND LAXMANRAO SHELKE**

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. १ फेब्रुवारी २०२५




## गजानन विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

**येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य केशव भांगे हे होते.**

गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी स्वयंशासन दिन साजरा केला. या स्वयंशासन दिनाच्या मुख्याध्यापिका भक्ती दहिवाले, उपमुख्याध्यापिका क्रांती सुपेकर, पर्यवेक्षक संकेत दराडे यांनी एक दिवसीय शाळेचे उत्कृष्णपणे काम केले. याप्रसंगी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य केशव भांगे यांनी स्वयंशासन दिनाचे महत्व सांगून अनेक विद्यार्थी चांगले घडत असतात, ते अशाच कार्यक्रमातून पुढे येऊन भविष्यात मोठे होतात असे ते म्हणाले. यावेळी उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस., पर्यवेक्षक दगडे व्ही.एन., शेख एस.वाय., भोसले बी.एस., सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तकर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.सरिता झांजुर्णे, आरती मोराळे यांनी केले तर शेवटी सृष्टी काळे हिने उपस्थितांचे आभार मानले.

# सामान्य माणूस जोपर्यंत विचार मांडणार नाही तोपर्यंत त्याला सामाजिक बदल, क्रांतीचा हक्क मिळणार नाही : सिध्दार्थ गोदाम

### अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाचा राज्यस्तरीय मूकनायक पुरस्कार सिध्दार्थ गोदाम यांना दिमाखदार सोहळ्यात प्रदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

समाजातील उपेक्षित, वंचित, दबलेल्या लोकांवर जेव्हा अन्याय, अत्याचार होतो तेव्हा त्यांच्याकडे सरकार, यंत्रणा, मिडीया लवकर लक्ष देत नाही. त्या लोकांसाठी सोशल मीडिया एक उत्तम मार्ग आहे. आज जरी आम्ही पत्रकारिता क्षेत्रात काम करीत असलो तरी काही बातम्या आमच्याकडूनही सुटतात. त्याची माहिती आम्हाला सोशल मीडियाद्वारेच मिळते. आज प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे, डोक्यात विचार आहे, सोशल मीडिया फुकट आहे, प्रत्येकजण आता पत्रकार झाला असून प्रत्येकाने बोलले पाहिजे. कारण जोपर्यंत सामान्य माणूस विचार मांडणार नाही, तो पर्यंत सामाजिक बदल, क्रांतीचा हक्क त्याला मिळणार नाही. बदल, क्रांती समाजातील घटक म्हणून आपणच करीत असतो, असे मत मराठवाड्यातील न्यूज १८ चे ब्युरो चिफ सिध्दार्थ गोदाम यांनी व्यक्त केले.

अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा राज्यस्तरीय मूकनायक पुरस्कार मराठवाड्यातील न्यूज १८ चे ब्युरो चिफ सिध्दार्थ गोदाम यांना दिमाखदार सोहळ्यात मंगळवारी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी सिध्दार्थ गोदाम बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करुन करण्यात आली. आपल्या विस्तारित भाषणात बोलताना सिध्दार्थ गोदाम म्हणाले की, सोशल मीडिया काय करु शकतो ? हे मागच्या १० वर्षाच्या काळात जर आपण केंद्रांत ज्यांचं सरकार विराजमान आहे, त्यांच्याकडे पाहिल्यास लक्षात येईल. त्यांनी त्याचा वापर पुरेपूर केला. आपण सुध्दा आधुनिक जे



काय चाललयं ते बघितले पाहिजे, वाचले पाहिजे, वापरले पाहिजे आणि इतरांना सांगितले पाहिजे. त्याशिवाय समाजात बदल होणार नाहीत, असेही सिध्दार्थ गोदाम यांनी सांगितले. समाजात आता विचार होताना दिसत नाही, ही खऱ्या अर्थाने धोक्याची घंटा आहे. समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकीय समतोल बिघडत गेले तर बीड सारख्या घटना इतर राज्यातही घडायला वेळ लागणार नाही. आपण आता सजग व्हायला पाहिजे आणि चुकीच्या गोष्टींबद्दल बोलायला शिकले पाहिजे, तरच समाजात काही प्रमाणात बदल व्हायला सुरुवात होईल, असेही सिध्दार्थ गोदाम यांनी सांगितले. मूकनायक चे उदिष्ट, ध्येय हे माझ्या अंगात अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करील असे भाषणाच्या शेवटी त्यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायक का सुरू केले ? डॉ. आंबेडकरांनी मूकनायक मध्ये केलेले लिखाण आजही कसे समाजातील परिस्थितीवर भाष्य करते याचे सिध्दार्थ गोदाम यांनी आपल्या विस्तारित भाषणात अनेक उदाहरणे दिली. यावेळी उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे म्हणाले की, शब्द आणि लेखणी इतके पॉवरफुल कोणतेही शस्त्र नाही आणि ही लेखणी असते पत्रकाराच्या हातात आणि पत्रकार असतो मूकनायक. पत्रकार हे समाजातील सत्य शोधत असतो. सत्य शोधणाऱ्या पत्रकारांची समाजाला नितांत गरज असते. समाजातील प्रत्येक माणसाने सत्य स्वीकारण्याची हिम्मत ठेवायला पाहिजे, असे सांगत मूकनायक पुरस्कार सिध्दार्थ गोदाम यांना मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तसेच अध्यक्षीय समारोपात माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ समाजातील गुणवंतांना प्रोत्साहन देण्याचे काम सातत्याने करीत आहे, असे सांगत मूकनायक पुरस्कार प्राप्त सिध्दार्थ गोदाम यांचे अभिनंदन केले.

मूकनायक दिनाच्या कार्यक्रमात शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यात यमुना जनार्धन सोनवणे, सय्यद जहीरअली शाह कादरी, ईश्वरी खाडे, कल्याणी तपकिरे, आरती कस्तुरे, अजय होळंबे, साक्षी देशमुख, वंदना राहुल सुरवसे, अमित राजेसाहेब लोमटे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष महादेव गोरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार सचिव गणेश जाधव यांनी मानले. सूत्रसंचालन परमेश्वर गित्ते यांनी केले. कार्यक्रमात गायक बळीराम उपाडे यांनी प्रबोधनात्मक गीते सादर केली.होती कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे सन्माननीय सदस्य जगन (बापू) सरवदे, प्रा. प्रदिप तरकसे, परमेश्वर गित्ते, दादासाहेब कसबे, रोहिदास हातागळे, संभाजी मस्के, धनंजय जाधव, विश्वजीत गंडले, दत्ता वालेकर, प्रवीण कुरकूट, रवि आरसुडे, रतन मोती यांच्यासह आदी सदस्यांनी प्रयत्न केले. अंबाजोगाई तालुका पत्रकार संघाने आयोजित केलेल्या मूकनायक दिनाच्या कार्यक्रमासाठी सर्वच क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या हिंगोली जिल्हाध्यक्ष पदी संदीप घुगे तर जिल्हा उपाध्यक्षपदी शिवशंकर निरगुडे

**हिंगोली । प्रतिनिधी**

अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या सदस्यांची हिंगोली येथील शासकीय विश्रांमग्रह येथे शुक्रवार दिनांक ३१/०१/२०२५ रोजी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे केंद्रीय अध्यक्ष मनोहर सुने,केंद्रीय उपाध्यक्ष युसूफ खान,केंद्रीय महाराष्ट्र प्रदेशअध्यक्ष कैलासबापू देशमुख,महाराष्ट्र प्रदेश सचिव गोपालराव सरनायक यांच्या मार्गदर्शनाखाली हि बैठक आयोजित करण्यात आली होती बैठकीच्या अध्यक्षस्थानी पूर्व जिल्हाध्यक्ष हिंगोली गजाननराव देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून



प्रदेश सचिव गोपालराव सरनाईक यांची उपस्थिती होती.

ही बैठक अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे प्रदेश सचिव गोपालराव सरनायक यांच्या प्रमूख उपस्थितीत पार पडली. यावेळी नूतन जिल्हाध्यक्षपदी संदीपराव घुगे तर जिल्हा उपाध्यक्षपदी शिवशंकर निरगुडे यांची निवड करण्यात आली व त्यांचा सत्कार देखील करण्यात आला त्याचबरोबर जिल्हा कार्यकारणी व तालुक्यांच्या काही निवडी करण्यात आल्या जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी गोपाल सातपुते जिल्हा कार्याध्यक्षपदी गजाननराव मगर सह जिल्हाकार्याध्यक्ष पदी सिद्धार्थ कुन्हे जिल्हा सचिव पदी गजानन देशमुख जिल्हा सहसचिव पदी पांडुरंग करहाळे जिल्हा कोषाध्यक्षपदी शंकर भैराने जिल्हा सल्लागार पदी महेंद्र पुरी जिल्हा संघटक निळकंठ भादलकर जिल्हा सहसंघटक पदी गणेश सुतार हिंगोली तालुकाध्यक्षपदी रमेश आढळकर सेनगाव तालुकाध्यक्ष शिवा पाटील यांच्या निवडी करण्यात आल्या यावेळी हिंगोली जिल्ह्यातील पत्रकार बांधवांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## सेवानिवृत्त मुख्याध्यापक पी.एम.पवार यांना पत्नीशोक

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील रहिवाशी तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रभाकर मारुती पवार यांच्या पत्नी निलावती प्रभाकर पवार यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाल्याने पिंपळवंडी व पिंपळवंडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.त्या



धार्मिक वृत्तीच्या तसेच त्यांचा शांत,संयमी व मनमिळाऊ स्वभाव होता.त्यांना दि.३० गुरुवार रोजी सकाळी अचानक चक्कर येऊन त्रास होऊ लागल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात नेले होते.परंतु, उपचारादरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांची रात्री १२:३० वा.प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिव देहावर दि.३१/०१/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी ११ वा.त्यांच्या शेतामध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी माजी आमदार सुनील दादा धांडे,जिल्हा परिषद सदस्यपती माऊली जरांगे आदीसह परिसरातील सरपंच,उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य,चेअरमन सर्व स्तरातील सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील, शिक्षक, पत्रकार,आप्तेष्ट- नातेवाईक, व्यापारी,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती प्रभाकर पवार गुरुजी,विवाहित दोन मुले विजयकुमार,राजेंद्र,विवाहित मुलगी,जावई,सुना,नातवंड,पत्रंड व दीर सेवानिवृत्त शिक्षक ए.एम.पवार सर,जाऊबाई असा मोठा परिवार आहे.त्यांच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.



## सरस्वती विद्यामंदिरात आज हुतात्मा दिन राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथी साजरी

**बीड । प्रतिनीधी**

आज दिनांक ३० जानेवारी -२०२५ रोजी सरस्वती विद्यामंदिरात अहिंसेचे जनक राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.सदरील कार्यक्रमाप्रसंगी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठे विभाग प्रमुख श्रीम.तुपारे मॅडम व श्रीम.राऊतमारे मॅडम आदिंचे सहकार्य लाभले प्रसंगी प्रशालेचे नाव श्री.गोरे सर यांचेसह सर्व श शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## 'बीडला सुरळीत पाणीपुरवठा, जालना रोड नाला कामासह १७ डीपी रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावणार'

बीड । प्रतिनिधी

डीपीसी बैठकीसाठी बीडमध्ये आलेले राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बीड शहरातील अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवावेत असे मागण्यांचे निवेदन अमर नाईकवाडे,फारुक पटेल यांनी दिले. बीड शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी थकीत ४१ कोटी ७५ लाख रुपयांची थकबाकी भरण्यासाठी विशेष बाब म्हणून निधी मंजूर करुन द्यावा. तसेच शहरातील जालना रोडचा दोन्ही बाजूचा नाला व नगरोत्थानधील १७ डीपी रस्त्यांच्या आराखड्याला मंजुरी द्यावी. हे तीन प्रश्न तत्काळ मार्गी लावावेत अशी मागणी केली. यावर बीड शहरातील विकासाचे सर्व प्रश्न मार्गी लावणार अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गुरुवारी (दि.३०) सकाळी साडेसात वाजता येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात आगमन झाले. यावेळी नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारुक पटेल यांनी निवेदनाद्वारे बीड शहरातील ज्वलंत प्रश्न त्यांच्यासमोर मांडले. यावेळी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे, माजी आ.अमरसिंह पंडित हे उपस्थित होते. बीड शहरातून जाणारा प्रमुख मार्ग असलेला छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक ते आनंदवाडी पर्यंत (बिंदुसरा नदी) या भागात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने दोन वर्षांपूर्वीच सिमेंट रस्ता काम पूर्ण केलेले आहे. परंतु या रस्त्याच्या दोन्ही बाजूने सिमेंट काँक्रीट नाल्याचे बांधकाम केल्यास पावसाचे वाहणारे पाणी व शहरातील उप नाल्याचे पाणी दोन्ही बाजूने वाहत जाऊन ते आनंदवाडी शिवारातील बिंदुसरा नदी पात्रात जाऊन मिळेल. सदर नाला बांधकाम पूर्ण झाल्यास शहरातील प्रमुख जालना रोडवरील वाहतुकीची समस्या दूर होईल व बाजारपेठेतील व्यापारी बांधवांसह शहरातील नागरिकांना दिलासा मिळेल करिता आपण सदर नाल्याच्या बांधकामास लागणारा निधी रुपये ७ कोटी मंजूर करावा. तसेच बीडला पाणी पुरवठा करणाऱ्या काडीवडगाव पंपिंग स्टेशन व ईट जलशुद्धीकरण केंद्र या दोन्ही ठिकाणाची महावितरणची एकूण थकबाकी रक्कम रु. ४१ कोटी ७५ लाख रुपये आहे. या वीज बिलाची रक्कम एक रकमी भरणे नगर परिषदेत शक्य नाही.शासन स्तरावरून याकरिता विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करून द्यावा. नगरपरिषद बीडने शहरातील १७ डीपी रस्त्यांचा प्रकल्प आराखडा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडे मंजुरीसाठी दाखल केलेला आहे. आपण स्वत: लक्ष घालून सदर रस्ता प्रकल्प आराखड्यात मंजुरी द्यावी.हे तीनही प्रश्न आपण तत्काळ लक्ष घालून सोडवावेत अशी विनंती उपमुख्यमंत्री अजित पवार यांना नगरसेवक अमर नाईकवाडे व गटनेते फारुख पटेल यांनी केली. यावर तुमचे सर्व विषय लवकरच मार्गी लावतो असे अजित दादांनी आश्वासित केले. शहराच्या विकासाचे प्रश्न मार्गी लागणार असल्याने उपमुख्यमंत्री अजितदादांचा बीड दौरा बीडकरांसाठी फलदायी ठरल्याच्या भावना नागरिकातून व्यक्त होत आहेत.

## श्री गणेश विद्या मंदिर शाळेचे सेवक अजिनाथ पोकळे यांचा सेवापूर्ती समारंभ

अंमळनेर । प्रतिनिधी

अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्यामंदिर विद्यालयाचे सेवक श्री अजिनाथ पोकळे यांचा सेवापूर्ती कृतज्ञता समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ए.टी. पोकळे होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील व सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक आर एम हाके व सहकारी शिक्षकांच्या हस्ते कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकामध्ये शाळेचे सहशिक्षक एफ एस जाधवर यांनी विद्यालयाचे सेवक अजिनाथ पोकळे यांच्या शाळेतील कार्याविषयी माहिती सांगितली.यानंतर शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांच्यावतीने अजिनाथ पोकळे यांचा शाल, पोशाख तसेच पितळी हंड्याच्या स्वरूपात भेटवस्तू देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. यानंतर उपस्थित मान्यवरांनी देखील दोघांचा शाल व पुष्पगुच्छ



देऊन सत्कार केला.यानंतर जिल्हा परिषद सदस्य माऊलीजरांगे यांनी सामाजिक जडणघडणीमध्ये शाळा व शिक्षकांची भूमिका स्पष्ट करून अजिनाथ पोकळे यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.नंतर शाळेचे सहशिक्षक रामहारी खलाटे सरांनी अजिनाथ पोकळे ह्यांच्या दिलखुलास स्वभाव व सहकार्यवृत्ती विषयी मनोगत व्यक्त केले.नंतर अजिनाथ पोकळे यांचे बंधू उद्धव पोकळे यांनी अजिनाथ पोकळे यांनी पार पाडलेल्या कौटुंबिक जबाबदाऱ्यांविषयी मनोगत व्यक्त केले. यानंतर जि.प.बीड माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे यांनी जुन्या व नव्या काळातील शैक्षणिक क्षेत्रात झालेल्या घडामोडींचा आढावा घेऊन शाळेतील त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला व अजिनाथ पोकळे यांनी निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

नंतर माजी पर्यवेक्षक आर के डुकरे व माजी मुख्याध्यापक बी डी पाठक सरांनी आपापली मनोगते व्यक्त करून त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.आपल्या अध्यक्षीय भाषणात रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य मा. प्राचार्य ए टी पोकळे यांनी अजिनाथ पोकळे यांच्या सेवाकाळातील कार्याविषयी तसेच शालेय विकासासाठी दिलेल्या योगदानाविषयी माहिती सांगून त्यांना त्यांच्या पुढील निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सेवापूर्ती कार्यक्रमास शाळेचे माजी मुख्याध्यापक तथा माजी सहाय्यक विभागीय अधिकारी शिवाजीराव तापकीर,माजी जि.प.सदस्य गो गो मिसाळ,शाळेचे माजी मुख्याध्यापक एस डी गुळवे,एस पी उंडे, बी व्ही वरडूळे, ए बी शेकडे, आर एल उंडे, एस ए तरटे, एस आर उगले,सौ.जयश्री पवार,मुख्याध्यापक वैष्णव शिंदे, सांगळे ,स्थानिक स्कूल कमिटी सदस्य मुरलीधर पवार, अंमळनेरचे सरपंच सोमनाथ गाडे,मा.सरपंच सुभाषआण्णा पोकळे, उद्धवशेठ पवार,ग्रा.पं.सदस्य प्रल्हाद पोकळे, मनोज पोकळे सर,दिलीप केकान,कोकणे ,राजगुरू,मिसाळ, दादासाहेब पवार, आप्पासाहेब कांबळे,संजय पोकळे, राजेंद्र साळुंके, गोविंद काकडे,श्रीनिवास कोकणे,आनंद पवार,आघाव पत्रकार अविराज पवार,भाऊसाहेब पवार तसेच श्री अजिनाथ पोकळे यांच्या परिवारातील सदस्यांसह आप्तेष्ट,हितचिंतकांसह समस्त अंमळनेर ग्रामस्थ तसेच पंचक्रोशीतील शिक्षण प्रेमी नागरिक,शाळा हितचिंतक तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे सहशिक्षक अमोल काकडे,श्रीमती पंडागळे यांनी केले तर अमोल सदावर्ते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पान ६ वरून...

### पारंपारिक लोककला जीवंत

अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापूरकर म्हणाले की,नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित लोककला संवर्धन परिषदेमुळे योगेश्वरी शिक्षण संस्थेची एक वेगळी ओळख निर्माण झाली आणि कलावंतांना प्रोत्साहन मिळाल्याचे त्यांनी सांगितले.प्रास्तविक प्राचार्य पी.आर.थारकर यांनी केले.लोककला संवर्धन परिषद घेण्यामागील भूमिका नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संपदा कुलकर्णी यांनी सांगितली संचालन प्रा. ममता राठी,प्रा.सागर कुलकर्णी यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी मानले.

कलावंतांचे सादरीकरण

या परिषदेत कलावंतांनी विविध लोकवाद्यांचे वादन केले

थोरले व धाकटे देवघर येथील रंगकर्मींनी सर्वज्ञ दासोपंतांच्या लळीताचे सादरीकरण, जगत जननी महिला भजनी मंडळाचे भजन,तसेच एडके यांनी पोवाडा आणि कु.सृष्टी आचार्य हिने लावणी तर बंजारा गीताचेही सादरीकरण करण्यात आले लोककलांच्या संवर्धनाविषयी चर्चासत्रे, संशोधनात्मक लेखांचे वाचन, मुंबईच्या लोककला विद्यापीठाचे साईश देशपांडे, डॉ.गणेश चंदनशिवे, मोनिका ठक्कर, नांदेडच्या वैशाली गोस्वामी यांच्यासह इतर लोककला अभ्यासकांनी विविध लोककलांची माहिती ऑनलाईन पद्धतीने दिली या कार्यक्रमास परिसरातील सर्व रसिक,श्रोते, विद्यार्थी,कर्मचारी उपस्थित होते.

### संविधानाचा उदय' हे

प्रसारक मंडळा अंतर्गत असणाऱ्या सर्व विभागाचे प्राचार्य, मुख्याध्यापक ,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पालक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.ध्वजारोहण झाल्यानंतर प्रा वसंत चव्हाण यांनी प्रजासत्ताक दिनाविषयी उपस्थित विद्यार्थी व पालकांना सविस्तर माहिती दिली. श्री बालाजी शिक्षण संस्था ही वेळोवेळी विद्यार्थ्यांना काहीतरी नवीन्यपुर्व गोष्टी शिकवत असते. त्यामुळे बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे विद्यार्थी महाराष्ट्र भर आपले नाव उज्वल करत असल्याचे दिसून येत असल्याचे प्रा चव्हाण यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या महानाट्याची सुरुवात १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाने करण्यात आली. ब्रिटिश भारतात व्यापारी म्हणून आले व कालांतराने उन्मत्त राज्यकर्ते झाले.या उन्मत्त ब्रिटिशांना आपल्या महान स्वातंत्र्य सैनिक व महापुरुषांनी भारत छोडो ची चळवळ उभी केल्याचे हुबेहूब सादर केले. यामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद , डॉ राजेंद्र प्रसाद सरोजिनी नायडू यांच्या स्वातंत्र्य भारतासाठी बैठका त्यांचे पात्र साकारत दाखवण्यात आल्या. त्यानंतर ८ऑगस्ट ची गांधीजीनी घेतलेली सभा व त्यांनंतर गांधीजींना झालेली अटक हे देखील नाट्यमय रित्या विद्यार्थ्यांनी साकारले. त्यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेची निर्मिती व त्यांचे भाषण सादर केले गेले.

१५० वर्षाच्या ब्रिटिशांच्या गुलामगिरीतुन १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला त्यावेळचा आनंदोत्सव विद्यार्थ्यांना उलगडून सादर केला. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते ध्वजारोहण व भाषण झाले. त्यानंतर डॉ राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली डॉ बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, महात्मा गांधी, हंसा मेहता, जे बी कृपलानी, डॉ सच्छिदानानंद सिन्हा, मौलाना अबुल कलाम, सरोजिनी नायडू, विजयालक्ष्मी पंडित, अम्मू स्वामिनाथन या सर्व सदस्यांची संविधान निर्मिती संदर्भात बैठक अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून साकारण्यात आली. या बैठकीत वेगवेगळ्या विषय समित्या स्थापन करण्यात आल्या. संविधान निर्मिती साठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अध्यक्ष म्हणून घोषित करण्यात आले. त्यानंतर अमेरिकेच्या संविधानाला एक आदर्श म्हणून पुढे ठेवत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सात सदसीय मसुदा समितीने २ वर्षे ११ महिने १८ दिवस काम केले.२६ जानेवारी १९५० रोजी भारताने संविधान स्वीकारले . तो दिवस म्हणजेच भारताचा प्रजासत्ताक दिन म्हणून आपण सर्व भारतवासी साजरा करत आसल्याचे श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या महानाट्याद्वारे सादर केले. हे महानाट्य पाहण्यासाठी अंबाजोगाई शहरातील अनेक विद्यार्थी, पालक प्रतिष्ठित नागरिक तसेच स्वातंत्र्य सैनिक उपस्थित होते. सादर करण्यात आलेल्या नाटिकेबद्दल सर्वजण विद्यार्थ्यांचे त्याचबरोबर संयोजक राजकिशोर मोदी व संकेत मोदी यांचे अभिनंदन व कौतुक करत होते. अंबाजोगाई शहरात श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी हे प्रत्येक वेळी कुठलीतरी नवीन संकल्पना अंबाजोगाई करांसमोर सादर करतात त्याबद्दल संकेत मोदी यांचे विशेष असे कौतुक व सन्मान करत होते. हे महानाट्य सादर करण्यासाठी संस्थेच्या सर्व शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### काव्यवाचनमध्ये भालेराव

रुपये व सन्मानचिन्ह) देण्यात आले. काव्यवाचन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. नागेश शेलार, डॉ. अभय शिंदे, अनिल गर्जे यांनी काम पाहिले. स्पर्धेनंतर प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्रा. डॉ. अनिल हजारे, परीक्षक नागेश शेलार, डॉ. राजाराम सोनटक्के, अभय शिंदे, डॉ. अनिल गर्जे यांच्या हस्ते स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेसाठी प्रा. डॉ. अनिल हजारे तर काव्यवाचन स्पर्धेसाठी प्रा. डॉ. दिगंबर पाटील यांनी सूत्रसंचालन केले. शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी सकाळी १० ते १ व दुपारी २ ते ५ अशा दोन सत्रांमध्ये संस्था अंतर्गत सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

### रोजगार मेळाव्यात

सेंटर जालना ७, आई इन्शुरन्स अँड इन्व्हेस्टमेंट जालना १७, मोदी पाईप्स प्रा. लि. जालना १०, प्राईम सोल्युशन लिमिटेड (सलाम किसान) जालना २५, विक्रम टी प्रोसेसर प्रा. लि. जालना १४, देवअश्व होंडा शोरूम जालना ६, स्पंदना स्फूर्ति फायनान्शियल जालना ४, भुवन हुंदाई जालना २ अशी उमेदवारांची निवड केली गेली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल परिहार यांनी केले आणि आभार सुरेश बहुरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठ। कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे कौशल्य विकास अधिकारी भुजंग रिठे तसेच अमोल बोरकर, कैलास काळे, रविंद्र पाडमुख, विशाल जगरवाल, दिनेश उढाण, सोमेश शिंदे, अमर तुपे, शालिकराम वाघ आणि जे.ई.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, डॉ. सुनिल इंदुरकर, डॉ. सुशांत देशमुख व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. असे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, जालना यांनी केले.

### महावितरणामधील कायमस्वरूपी

माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी अपील क्रमांक २१०९-२११०/२००४ आणि दिनांक १९/०५/२०२३ रोजीच्या अपीलातील १९ प्रकरणांविषयी दिलेल्या निकालाद्वारे वितरण कंपनीला वीज पुरवठा खंडित केलेल्या जागेवरील थकबाकी ही सदर जागेच्या मालक / खरेदीदार / वहिवाटदार यांच्याकडून व्याजासह वसूल करण्याचा अधिकार महावितरणाला असल्याचे जाहीर केले आहे. तसेच ३१ मार्च २०२५ नंतर कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहक यांच्याकडून थकबाकी रक्कम सक्तीने वसूल केली जाईल. त्यामुळे महावितरण मधील कायमस्वरूपी खंडीत केलेल्या वीज ग्राहकांनी ३१ मार्च २०२५ पूर्व आपल्या जवळील महावितरण कार्यालयात जाऊन सदरील योजनेची माहिती घेऊन अभय योजनेचा लाभ घ्यावा. असे आवाहन क्रांतीकारी लाईफस्टाफ सेनाचे मराठवाडा प्रादेशिक अध्यक्ष शेख अमीर मदनी, अशोक धोंगडे, महादेव पाटील, ज्योतीराम चव्हाण, अश्वलिंग बरे, रजनीकांत तागड, गणेश कागदी, गजानन सोळुंके, गोकुळ गायकवाड यांनी केला आहे.


### चेक बुक हरवले

शहादेव बाबुलाल साळुंखे या नावाचे एसबीआय बँकेचे चेकबुक हरवले आहे जर कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क करा.

संपर्क ७७२०९९६४९५

# लाल मिरचीच्या दरात ३५ टक्क्यांपर्यंत घट

## खरेदी करण्याची शेतकऱ्यांची मागणी

पुणे : देशातील लाल मिरचीचे भाव मागील वर्षभरात कमी होत गेले. सध्या मिरचीला १२ हजार ते १४ हजारांच्या दरम्यान सरासरी भाव मिळत आहे. जानेवारी २०२४ मधील दराच्या तुलनेत सध्या ३५ टक्के कमी भाव मिळत आहे. यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. सरकारने मिरचीची २० हजार रुपये क्विंटलने खरेदी करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

देशातील बाजारात मिरचीच्या भावात मागील वर्षात चांगली तेजी होती. २०२३ मध्ये मिरचीचा भाव २५ हजारांपर्यंत पोचला होता. त्यानंतर भाव कमी होत गेले. जानेवारी २०२४ मध्ये मिरचीचा भाव १९ हजारांवर पोहचला होता. बहुतांशी बाजारात मिरची १८ हजार ते २० हजाराने विकली जात होती. पण त्यानंतरही मिरचीचे भाव कमी होत गेले. सध्या देशातील बहुतांशी बाजारात मिरची १२ हजार ते १४ हजारांच्या दरम्यान विकली जात आहे. मिरचीचे भाव पडल्याने शेतकरी मात्र अडचणीत आले आहेत. जागतिक पातळीवर ५५ ते ६० लाख टनांच्या दरम्यान मिरची उत्पादन होत असते. जगात सर्वाधिक उत्पादन भारतात होते. भारत जवळपास निम्मे उत्पादन घेतो. देशात मागील हंगामात २८ लाख टन मिरची उत्पादन झाले होते. आंध्रप्रदेश आणि तेलंगणात मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. मागील काही वर्षात भाव मिळत नसल्याने या दोन्ही राज्यातील मिरची लागवड



कमी होत आहे. तरीही शेतकऱ्यांना भाव मिळत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. देशातून होणारी लाल मिरचीची निर्यातही कमी झाली आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये ३६ हजार टनांची निर्यात झाली होती. आधीच्या महिन्यातील निर्यातीच्या तुलनेत ही निर्यात ४ टक्क्यांनी कमी होती. तर एप्रिल ते ऑक्टोबर या काळात देशातून ३ लाख ३१ हजार टनांची निर्यात झाली. तर मागील हंगामात याच काळातील निर्यात ३ लाख टन होती. म्हणजेच लाल मिरचीची निर्यात वाढली होती. मात्र निर्यातीचे मूल्य कमी झाले. मागच्या वर्षी निर्यात कमी असूनही त्यातून ७ हजार ५७४ कोटी डॉलर मिळाले होते. मात्र यंदाच्या आर्थिक वर्षात पहिल्या ७ महिन्यांमध्ये निर्यातीचे मूल्य १५ टक्क्यांनी कमी होऊन ६ हजार ४५१ कोटी डॉलरपर्यंत कमी झाले होते. म्हणजेच भाव कमी झाल्याने निर्यात वाढूनही निर्यातमूल्य कमीच राहीले.

### शासनाच्या मदतीची गरज

बाजारात लाल मिरचीचे भाव कमी झाल्यामुळे शेतकरी अडचणीत आले आहेत. भाव कमी असल्याने शेतकऱ्यांनी मिरची शीतगृहात साठवण्याला प्राधान्य दिले. मिरचीचे भाव वर्षभराआधीच्या तुलनेत ३५ टक्क्यांनी कमी झाले. तर २०२३ मधील उच्चांकी भावाच्या तुलनेत निम्म्याने कमी झाले आहेत. या भावात मिरची विकल्यानंतर तोटा होण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकरी मिरची विकताना दिसत नाहीत. भाव कमी झाल्याने शेतकऱ्यांनी प्रतिक्विंटल २० हजाराने मिरची खरेदी करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

# शेतकऱ्यांनो फेब्रुवारी महिन्यात करा या ५ भाज्यांची लागवड

देशातील शेतकरी हंगाम आणि महिन्यानुसार त्यांच्या शेतात विविध पिके घेतात. जेणेकरून त्यांना त्यांच्या शेतीतून वेळेत चांगले उत्पन्न मिळू शकेल. याच अनुषंगाने शेतकऱ्यांसाठी फेब्रुवारी महिन्यात कोणत्या टॉप ५ भाज्यांच्या लागवड करावी याची माहिती जाणून घेण्याची गरज आहे.

तूर, मिरची, भेंडी, कारले आणि भोपळा या प्रमुख पाच भाज्यांना बाजारात मागणी खूप आहे. शेतकऱ्यांना त्याची लागवड करताना फार कष्ट करण्याची गरज नाही.

तूर : तुरीची लागवड जवळपास सर्व प्रकारच्या जमिनीत करता येते. याशिवाय जिवाणू असलेल्या नाल्यातही पेरणी करता येते. उष्ण आणि दमट हवामान आवश्यक असते. बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या तुरीची लागवड सुरू करण्यासाठी फेब्रुवारी हा सर्वोत्तम महिना आहे. कोरडच्या कडधान्याच्या बियांपासूनही तेल काढता येते. पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत.

कारले: शेतकरी जवळपास सर्व प्रकारच्या जमिनीत कारल्याची लागवड करू शकतात. परंतु कारली पिकापासून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी चांगला निचरा होणारी चिकणमातीची जमीन आवश्यक आहे. मिरची : मिरचीची लागवड खरीप आणि रब्बी पीक म्हणून करता येते. शेतकरी कधीही त्यांच्या शेतात मिरचीचे पीक लावू शकतात. खरीप पिकांसाठी पेरणीचे महिने मे ते जून असतात तर रब्बी पिकांसाठी सप्टेंबर ते ऑक्टोबर. परंतु उन्हाळी पीक म्हणून मिरचीची लागवड केल्यास जानेवारी आणि फेब्रुवारी हे महिने उत्तम मानले जातात.

भोपळा : देशातील शेतकरी डोंगराळ भागात तसेच सपाट भागात सहजपणे भोपळा लागवड करू शकतात. लागवडीसाठी उष्ण व दमट हवामान आवश्यक असते. भोपळा बिया शेतात पेरण्यापूर्वी २४ तास पाण्यात भिजत ठेवा. हे बियाणे उगवण प्रक्रियेला गती देते. या प्रक्रियेनंतर बियाणे शेतात पेरण्यासाठी तयार होते.

भेंडी : भेंडी ही भारतीय बाजारपेठेत सर्वाधिक खरेदी केलेली भाजी आहे. ही एक भाजी आहे जी देशाच्या बहुतेक भागात लागवड केली जाते. भेंडीचे तीन मुख्य लागवड हंगाम फेब्रुवारी-एप्रिल, जून-जुलै आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर आहेत. या काळात शेतकरी भेंडी लागवड करून चांगले उत्पन्न मिळवू शकतात.



# कोळशाचा वापर करून वाढवा मातीची उत्पादकता

आजपर्यंत आपण कोळशाचे वेगवेगळे उपयोग बघितले आहेत, सध्या तर टूथपेस्ट मध्ये चारकोल म्हणजेच कोळशाचा वापर केला जातो अशा जाहिराती सुद्धा येतात. परंतु शेतकरी बंधुंनो तुम्हाला माहित आहे का या कोळशाचा खत म्हणून सुद्धा वापर करू शकता. कोळसा जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. तुम्ही बाजारातून कोळसा विकत घेऊ शकता किंवा घरी बनवू शकता.

चारकोल म्हणजे लाकूड कोळसा, तुम्ही त्याचा खत म्हणूनही वापर करू शकता. चारकोल किंवा बायोचार शेतीसाठी खूप फायदेशीर ठरतात आणि जमिनीची सुपीकता वाढवतात. तुम्हाला हवे असल्यास ते तुम्ही घरी बनवू शकता किंवा बाजारातून विकले जाते, ते विकत घेऊन शेतात टाकू शकता.

घरी कोळसा कसा बनवायचा :

जर तुम्हाला ते घरी बनवायचे असेल तर तुम्ही ड्रम पद्धत वापरू शकता. जे हैद्राबाद येथील सेंट्रल रेनफेड कृषी संशोधन संस्थेने तयार केले आहे. त्यात एक ड्रम असतो ज्यामध्ये कोळसा तयार केला जातो. या पद्धतीत बायोमासचे अवशेष ड्रममध्ये ठेवून त्याला आग लावली जाते. हा ड्रम ९०-९५ मिनिटे चुलीवर ठेवला जातो. नंतर ते खाली उतरवले जाते, त्याचे झाकण बंद केले जाते आणि त्यावर ओली माती झाकली जाते. यापासून कोळसा तयार केला जातो. शेतकरी आपल्या शेतात या कोळशाचा वापर करून पीक उत्पादन वाढवू शकतात. पेरणीपूर्वी आणि उभ्या पिकात शेताची



नांगरणी करताना १०-१५ सेमी खोलीवर कोळशाची भुकटी टाकावी. हे एकाच वेळी मोठ्या प्रमाणात किंवा लहान प्रमाणात अनेक वेळा वापरले जाऊ शकते. काही प्रमाणात खत कमी करून आणि त्या जागी काही प्रमाणात बायोचार वापरूनही उत्पादनात वाढ करता येते.

कोळशाचे फायदे : कोळसा पिकांसाठी कितपत फायदेशीर आहे हे तो कोणत्या तापमानाला तयार होतो यावर अवलंबून असतो. जर तापमान जास्त असेल तर त्यातील पोषक द्रव्ये मरतात, तर ५००-६०० अंश सेल्सिअस तापमानात तयार केलेला कोळसा जमिनीला अधिक फायदे देतो. अशा कोळशामुळे जमिनीची सुपीकता वाढते. कमी तापमानात बनवलेल्या कोळशामध्ये किंवा बायोचारमध्ये पोषक तत्वे नष्ट होत नाहीत. त्यामुळे ते शेतीसाठी योग्य मानले जाते. कोळशामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांचे प्रमाण वाढते.

पीक उत्पादन वाढवण्याबरोबरच कोळशामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते. पीक पेरण्यापासून ते तयार होईपर्यंत कोळशाचा वापर करता येतो. हे पिकांना सुरुवातीच्या अवस्थेतच अधिक पोषक तत्वे पुरवते, ज्यामुळे त्यांची वाढ सुधारते. त्यामुळे झाडांची मुळे, देठ, फुले, फळे यांची चांगली वाढ दिसून येते. कोळशामुळे जमिनीची आम्लताही कमी होते आणि सामू सुद्धा योग्य राहते.


# गाय आणि म्हशीच्या चाऱ्यात ही खास गोष्ट मिसळा, अतिरिक्त उत्पन्न मिळवा !

गायी आणि म्हशींच्या संगोपनासाठी आणि देशातील दुधाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सरकार दुधावर अनुदान देखील देते. असे असतानाही पशुपालकांना दूध बचतीतून पाहिजे तेवढा नफा मिळत नाही. चाऱ्याच्या दरात झालेली वाढ हेही यामागे एक प्रमुख कारण आहे. आज फार कमी प्रमाणात मोकळी कुरणे उरली आहेत, अशा स्थितीत पशुपालकांना हिरवा चारा विकत घेऊन जनावरांना द्यावा लागतो. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याची किंमत वाढल्या आहेत. अशा स्थितीत पशुपालक शेतकरी जनावरांना खास पशुखाद्य देऊ शकतात ज्यामुळे जनावरांच्या दुधाचे प्रमाण तर वाढेलच शिवाय पर्यावरणातील मिथेन वायूचे उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल. व यातून पशुपालकांचे उत्पन्न देखील दुप्पट होईल.

रवंथ करणाऱ्या गायी म्हशीमुळे सर्वात जास्त मिथेन वायू उत्सर्जित होते असे मानले जाते. पशुपालनात ही एक मोठी समस्या आहे. तज्ज्ञांच्या मते, पशुपालक शेतकऱ्यांनी त्यांच्या दुभत्या जनावरांच्या चाऱ्यात काही बदल केले तर मिथेन वायूचे उत्सर्जन काही प्रमाणात कमी होऊ शकते.

मिथेन वायूचे उत्सर्जन कमी करण्यासाठी कोणता चारा वापरावा?

तज्ज्ञांच्या मते गायी आणि म्हशी त्यांच्या तोंडातून सर्वाधिक मिथेन वायू उत्सर्जित करतात.



ते ज्या प्रकारचा चारा खातात ते चघळण्याच्या पहिल्या टप्प्यात जास्त मिथेन वायू तयार करतात, आणि ते वातावरणात सोडतात. यामुळे वातावरणातील मिथेन वायूचे प्रमाण वाढते जे ग्लोबल वॉर्मिंग वाढवण्यास मदत करते. अशा परिस्थितीत जनावरांच्या आहारात 'लाल शेवाळ' वापरून मिथेन वायू निर्मिती कमी करता येते. लाल शेवाळापासून तयार केलेले खाद्य जनावरांना दिल्याने दुधाचे प्रमाणही वाढते.

लाल शैवालपासून प्राण्यांसाठी अन्न कसे तयार करावे?: पशुपालक बाजारातून लाल शैवाल असलेले खाद्य विकत घेऊ शकतात. जनावरांचा चारा बनवताना रेड अल्गी किती प्रमाणात घालायचे याची काळजी घ्यावी. जनावरांच्या आहारात आवश्यकतेपेक्षा जास्त लाल शेवाळ टाकल्यास त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात. उदाहरणार्थ, कट फीडमध्ये किती लाल शैवाल घालायचे हे लक्षात ठेवणे फार महत्वाचे आहे. तुम्ही बाजारातून पशुखाद्य विकणाऱ्या दुकानातून लाल शैवाल खाद्य विकत घेतल्यास, पशुखाद्य आणि त्याच्या वापराच्या पद्धती संबंधित सूचनाही त्याच्या पॅकेटमध्ये लिहिलेल्या सूचनांनुसार तुम्ही पशुखाद्य तयार करू शकता.

जनावरांना लाल शेवाळ खाद्य देऊन दुप्पट नफा कसा मिळवायचा?

जर पशुपालकांनी लाल शैवाल असलेले विशेष पशुखाद्य विकत घेतले, तर फीड पॅकेटमध्ये नंबर असलेला एक कोड दिसतो. हा कोड कंपनीच्या ॲपवर जाऊन सबमिट करावा लागेल. या संख्यात्मक संहितेवरून हे कळते की पशुपालकांनी आपल्या जनावरांना किती लाल शैवाल खायला दिले आहे, ज्यामुळे मिथेन वायूचे उत्सर्जन कमी होण्यास मदत झाली आहे. त्याच्या मदतीने, पशुपालकाने किती मिथेन वायू उत्सर्जित होण्यापासून रोखला आहे हे देखील समजेल. त्याच आधारावर पशुपालकांना क्रेडिट क्रमांक मिळेल. यानंतर, पशुपालक या क्रमांकांची विक्री करून रोख नफा देखील मिळवू शकतात. अशा परिस्थितीत जनावरांच्या दुधाची विक्री करून आणि लाल शेवाळयुक्त खाद्य असलेला आहार जनावरांना देऊन शेतकरी दुप्पट कमाई करू शकतात.




## जागतिक दिवस
## भारतीय तटरक्षक दल दिवस

### महत्वाच्या घटना

१६८९ : गणोजी शिर्के यांच्या मदतीने मुघल सरदार शेख नजीबखान याने छत्रपती संभाजी महाराजांना कैद केले.
१७९० : न्यूयोर्क मध्ये पहिल्यांदा ''सुप्रीम कोर्ट ऑफ़ द यूनाइटेड स्टेट्स' चे आयोजन केल्या गेले.
१८२७ : कोलकता येथे बंगाल क्लब ची स्थापना झाली.
१८३५ : मॉरिशसमधे गुलामगिरी प्रथेचा अंत
१८८४ : 'ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी'ची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली.
१८८४ : देशात पोस्टल विमा योजना सुरु करण्यात आली.
१८९३ : थॉमस एडिसनने पहिल्या चलचित्रपटाची निर्मिती पूर्ण केली.
१९४१ : डॉ. के. बी. लेले यांनी 'गुरुकिल्ली' हे जादुविद्येला वाहिलेले मराठी भाषेतील पहिले नियतकालिक सुरू केले.
१९४६ : नऊ शतकांची राजसत्ता बरखास्त करुन प्रजासत्ताक बनण्यास हंगेरीच्या संसदेने मान्यता दिली.
१९५६ : सुधी रंजन दास यांनी भारताचे ५ वे सरन्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला.
१९६४ : प्र. बा. गजेन्द्रगडकर यांनी भारताचे ७ वे सरन्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला.
१९६४ : आजच्या दिवशी युनिटी ट्रस्ट ची स्थापना करण्यात आली.
१९७७ : 'इंडियन कोस्ट गार्ड चे स्थापना करण्यात आली.
१९७७ : आजच्या दिवशी देशातील पहिले राष्ट्रीय रेल्वे संग्रहालयाची दिल्ली येथे स्थापना करण्यात आली.
१९७९ : १५ वर्षे विजनवासात काढल्यानंतर ईराणचे आयातुल्ला खोमेनी तेहरानला परतले.
१९८१ : ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंडमधील एक दिवसीय क्रिकेट सामन्यात शेवटच्या चेंडुवर न्यूझीलंडला ६ धावा हव्या असताना ग्रेग चॅपलने आपला भाऊ ट्रेव्हर चॅपलला अंडरआर्म बॉल टाकण्यास सांगितले. ट्रेव्हरने चॅपलने तसा चेंडू टाकला व ऑस्ट्रेलियाने सामना जिंकला परंतु यानंतर अंडरआर्म गोलंदाजी बेकायदा ठरवण्यात आली.
१९८२ : पाकिस्तानी क्रिकेटपटू शोएब मलिक यांचा जन्म.
१९९२ : भोपाळच्या मुख्य न्यायाधीशांनी युनियन कार्बाइडचा मुख्य अधिकारी वॉरेन अँडरसन याला फरारी घोषित केले.
१९९२ : आजच्या दिवशी केंद्राशाशित प्रदेश दिल्लीला राष्ट्रीय राजधानी म्हणून दर्जा मिळाला.
१९९८ : पीटर कोरडा यांनी मार्सिलो रियोस यांना हरवून ऑस्ट्रेलिया ओपन टेनिस चॅम्पियनशिप आपल्या नावावर केली
२००२ : अमेरिकेचे प्रसिद्ध पत्रकार डेनियल पर्ल यांचे अपहरण करून त्यांची आजच्या दिवशी हत्या करण्यात आली.
२००४ : मक्का येथे चालू असलेल्या हज यात्रेत चेंगराचेंगरी होऊन २५१ यात्रेकरू ठार तर २४४ लोक जखमी झाले.
२०१३ : जागतिक बुरखा/हिजाब दिनाची स्थापना करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६४ : जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर – अमेरिकन वनस्पतीतज्ञ, शिक्षणतज्ञ, संशोधक आणि शास्त्रज्ञ (मृत्यू: ५ जानेवारी १९४३)
१८८४ : 'विद्यानिधी' सिद्धेश्वरशास्त्री विष्णू चित्राव महामहोपाध्याय, वैदिक साहित्याचे अभ्यासक व मराठी कोशकार (मृत्यू: ६ जानेवारी १९८४)
१९०१ : क्लार्क गेबल – अमेरिकन अभिनेता (मृत्यू: १६ नोव्हेंबर १९६०)
१९१२ : राजा बढे – संपादक, चित्रपट अभिनेते, लेखक, नाटककार, कादंबरीकार, कथाकथनकार, गायक, कवी आणि गीतकार (मृत्यू: ७ एप्रिल १९७७)
१९१४ : भारतीय प्रसिद्ध चित्रपट कलाकार अवतार किशन हंगल यांचा जन्म.
१९१५ : हैज या विषाणूवर संशोधन करणारे भारतीय शास्त्रज्ञ शंभूनाथ दे यांचा जन्म.
१९१७ : ए. के. हनगल – चित्रपट अभिनेते व स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: २६ ऑगस्ट २०१२)
१९२७ : मधुकर दत्तात्रय तथा म. द. हातकणंगलेकर – ज्येष्ठ समीक्षक आणि सांगली (२००८) येथील ८१ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे
१९२९ : जयंत साळगावकर – ज्योतिर्भास्कर, लेखक व उद्योजक (मृत्यू: २० ऑगस्ट २०१३)
१९३१ : बोरिस येलत्सिन – रशियन फेडरेशनचे पहिले अध्यक्ष (मृत्यू: २३ एप्रिल २००७)
१९५५ : प्रसिद्ध कुश्ती पैलवान सतपाल सिंह चा जन्म.
१९५६ : दक्षिणात्य चित्रपटांमध्ये काम करणारे कलाकार ब्रम्हानंद यांचा जन्म.
१९५७: बॉलीवूड चे प्रसिद्ध अभिनेते जॉकी श्रॉफ यांचा जन्म.
१९७१: अजय जडेजा – क्रिकेटपटू
१९८१: डग्लस एअरक्राफ्ट कंपनी चे संस्थापक डोनाल्ड विल्स डग्लस सिनियर यांचे निधन. (जन्म: ६ एप्रिल १८९२).

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८२ : ब्रिटीशांसाठी हिमालयाला एकस्फ्लोर करणारे भारतीय नैन सिंह रावत यांचे निधन.
१९७६ : वेर्नर हायसेनबर्ग – 'क्वांटम मॅकॅनिक्स'मधील मूलभूत संशोधनासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९३२) जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ५ डिसेंबर १९०१)
१९९५ : मोतीराम गजानन तथा मो. ग. रांगणेकर – नाटककार, चित्रपट दिग्दर्शक व पत्रकार (मृत्यू: १० एप्रिल १९०७)
२००३ : कल्पना चावला – भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर (जन्म: १ जुलै १९६१)
२०१२ : अनिल मोहिले – संगीतकार व संगीत संयोजक.

## थोडक्यात




### अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज – माऊली महाराज

पाटोदा । प्रतिनिधी

व्यसनाधीनता व अंधश्रद्धा ह्या समाजाच्या उन्नतीसाठी घातक असून विशेषतः युवकांनी व्यसनांपासून दूर राहणे आवश्यक आहे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन व्यसनाधीनता व अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन ह. भ. प. माऊली महाराज घोडके यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण व विस्तार सेवा कक्षाच्या वतीने 'अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, अज्ञान व विज्ञान' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर ह. भ. प. संतोष महाराज गर्जे, उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, कमवि उपप्राचार्य नामदेव चांगण, कक्षाचे समन्वयक डॉ. प्रकाश फड उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर हांगे यांनी, युवकांनी व्यसनांपासून अलिप्त राहून स्वतःची प्रगती साध्य केली पाहिजे व सातत्याने क्रियाशील राहिले पाहिजे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रकाश फड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रामचंद्र पवार यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. कल्याण घोडके यांनी केले.

### सुभाषचंद्र बोस यांच्या कर्तृत्वाची देशाला खरी गरज – प्रा.जाधवर

पाटोदा। प्रतिनिधी

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या त्यागामुळे व कर्तृत्वामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळीस प्रेरणा मिळाली. परंतु त्यांच्या अकाली निधनामुळे देशाला प्राप्त झालेले स्वातंत्र्य ते प्रत्यक्ष पाहू शकले नाही. त्यांच्यासमान कर्तृत्वाची आज देशाला खरी गरज आहे असे प्रतिपादन बलभीम महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ. बी. डी. जाधवर यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील महाविद्यालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त इतिहास विभागामार्फत आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, इतिहास विभागप्रमुख डॉ. प्रकाश फड, डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात डॉ. जाधवर यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान व आझाद हिंद सेनेची चळवळ यावर सविस्तर भाष्य केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य आबासाहेब हांगे म्हणाले की सुभाष चंद्र बोस हे त्यागाचे व बलिदानाचे एक ज्वलंत उदाहरण होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रकाश फड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले. आभार डॉ. यादव घोडके यांनी मानले. कार्यक्रमास संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# रूपामाता कारखान्यासमोर शेकापचे धरणे आंदोलन

## रूपमाता गुऱ्हाळाकडुन शेतकऱ्यांची लूट खपवून घेणार नाही – भाई नारायण गोले

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील रोषनपुरी येथील रुपमाता गुळ कारखान्याने शेतकऱ्यांच्या उसाचे व वाहतूक, तोडणीचे पैसे थकवल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला असून दि ३१ जानेवारी शुक्रवार रोजी रुपमाता कारखान्यासमोर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले.

माजलगाव तालुक्यातील रुपमाता गुळ कारखान्याने गतवर्षी सह चालू हंगामातील ऊस उत्पादकांचे,ऊस वाहतूक व ऊस तोडणी ठेकेदारांचे हक्काचे पैसे थकवले असून अनेक शेतकऱ्यांना हक्काचे पैसे न मिळाल्यामुळे रूपमाता गुर्हाळाचा उंबरा झिजवावा लागत आहे,तर अनेक शेतकऱ्यांच्या मुलीचे जमलेली लग्न देखील पुढे ढकलावे लागत आहेत.या शिवाय अनेक शेतकऱ्यांना बँकेच्या कर्जाचे हप्ते,खाजगी सावकाराचे कर्ज देणे असल्याने शेतकरी तब्बल दोन महिन्यापासून शेतकरी प्रतीक्षेत आहेत.या शिवाय काही शेतकऱ्यांचे गतवर्षीचे पैसे देखील कारखान्याने न दिल्याने शेतकरी कामगार पक्ष आक्रमक झाला, असून दि ३१ जानेवारी शुक्रवार रोजी कारखान्याच्या गेट समोर धरणे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात कारखाना प्रशासन यांच्याविरुद्ध प्रचंड घोषणाबाजी करत बिलांची मागणी करण्यात आली यावेळी पोलीस प्रशासनाने प्रचंड बंदोबस्त लावला होता तर कारखाना प्रशासनाचे प्रतिनिधी भाऊसाहेब गुंड यांनी १५ डिसेंबर पर्यंत बिले देऊन उर्वरित बिले तात्काळ काढण्याबाबत लेखी पत्र दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.



यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड.नारायण गोले पाटील यांनी शेतकऱ्यांची लुट कदापिही खपवून घेणार नसल्याचे सांगत तिव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला.

यावेळी श्रीराम शेवाळे, बाजीराव नाना ताकट,रंजीत जाधव,विठ्ठल आबा खेत्री,माऊली शिंदे, बापू बेद्रे,वैजनाथ टेकाळे,राजेभाऊ काका उमरीकर, ज्ञानेश्वर ताकट, दगडुबा गुळभिले, विकास टेकाळे, हनुमान डांगे, बिभिषण भोसले आदिंची उपस्थिती होती

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा: बीडमध्ये १४ उपकेंद्रावर ४४७९ परीक्षार्थी

बीड। प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण १४ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण ४ हजार ४७९ उमेदवार बसलेले आहेत.परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी १४ उपकेंद्रप्रमुख १४ मदतनीस ६५ पर्यवेक्षक २१७ समवेक्षक असे एकूण ३१० अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हाप्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी समाज कल्याणच्या सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे.

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. पेपरच्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेल्या परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत त्यांचे स्वतःच्या आधारकार्ड, निवडणूक आयोगाची ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. उमेदवारांना त्यांच्या परीक्षा व उपकेंद्रावर परीक्षेकरिता सकाळी ८.३० वाजता उपस्थित राहावे. सकाळी १०.३० वाजता नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवास उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## बंकट स्वामींच्या व माऊली दादांच्या कार्याने पुण्याचे पीक आले-मातकर

बीड। प्रतिनिधी

बालाघाटाची भूमी ही संत भूमी आहे. संत बंकटस्वामी महाराज व संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या पदस्पर्शाने या भूमीमध्ये पुण्याचे तसेच भक्तीचे भरभरून पीक आल्याचे प्रतिपादन उपप्राचार्य ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातकर यांनी केले. श्री क्षेत्र चाकरवाडी संस्थानचे अध्यक्ष गुरुवर्य ह.भ.प.महादेव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली येळंबघाट येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील कीर्तन सेवेत ते बोलत होते. जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या इहलोकीचा हा देह देव इच्छितात्ती पाहे धन्य आम्ही जन्मा आलो दास विठोबाचे झालो या अभंगावर निरूपण केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, वारकरी सांप्रदाय हा माणसांना माणूस बनविणारा सांप्रदाय आहे. बंकट स्वामी महाराजांनी महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची आचारसंहिता दिली. तर माऊली दादांनी गावागावात भक्ती संप्रदायाचे मुळे बहरवण्याचे महान काम केले. देव दुर्लभ मनुष्य देह सत्कारणी लावण्यासाठी आपण सातत्याने सदाचार ,सद्विचार , सद्भावना ,सत्संग , सद्भक्ती, परोपकार इत्यादी मार्गांनेच वाटचाल करावी. अनंत जन्मानंतर मनुष्य देह प्राप्त झाला आहे तो व्यसन , दुराभिमान, दूरवर्तन ,दुष्कर्म अशा वाईट गोष्टीत घालवता कामा नये. म्हणून अत्यंतिक दुःखाचे निवृत्ती करून परमानंदाची प्राप्ती करण्यातच मनुष्याचे हित आहे, हेच साधुसंत आपणास समजावतात. कीर्तनसाथीसाठी कीर्तनकार प्रशांत क्षीरसागर, गायक बंडू जटाळ, राधाकिसन माखले, बन्सी शेळके, त्रिंबक शेळके ,रोडे महाराज, रतन कांबळे ,बंडू चादर ,बापू काका यांची साथ होती. मृदंगसाथ अमोल महाराज पवार, अविष्कार महाराज क्षीरसागर, गणेश महाराज भोसले यांची होती. कीर्तनासाठी महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्यासह,चाकरवाडीचे पोलीस पाटील नानासाहेब काकडे, सरपंच दिनेश कदम, प्रा. रामहरी कदम, प्रा.बाबासाहेब सोंडगे, जयवंत टेकाळे, राम कदम, दिनकर अप्पा कदम, उपसरपंच सेवानंद कदम, अशोकराव पाटील ,अरुण चादर, एल.डी.नाना , हनुमंत क्षीरसागर यांच्यासह गावातील हजारो भाविक उपस्थित होते.

## जय जवान विद्यालयात महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा दिन

वडवणी। प्रतिनिधी

आज रोजी दि.३० जानेवारी २०२५ वार गुरुवार रोजी जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बू. ता.वडवणी जी.बीड येथील विद्यालयात थोर महान राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली तसेच या निम्मित हुतात्मा दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी प्रमूख उपस्थित मान्यवर संस्था अध्यक्ष,सचिव साहेब व पदाधिकारी, आदी मान्यवर,विद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य आदी सर्वांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पावन प्रतिमेचे पूजन करून हार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

व आपल्या स्वातंत्र्य लढ्यातील थोर महान वीर,वीरांगना यांच्या प्रती हुतात्मा दिनानिमित्त मौन धारण करून त्यांना विनम्र आदरांजली वाहण्यात आली.तसेच कार्यक्रमाची प्रस्ताविक ताले सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.चोपडे सर यांनी केले.त्याच बरोबर या कार्यक्रमासाठी विद्यालयातील वर्ग ८ ते १२ वी मधील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या मधुन पूजा बंडगर ,अमृता करे, उम्मेअक्सा शेख, पल्लवी करे या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट पणे आपले मनोगत व्यक्त केले. तसेच उपस्थित प्रमुख पाहुणे,कार्यक्रमाचे अध्यक्ष, व मान्यवर व्यक्ती यांनी आपल्या मनोगतातून अनमोल असे मार्गदर्शन उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना केले.त्याच बरोबर सर्व शिक्षक वृंद यांनीही आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. निमित्त तसेच या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ नागरिक, शिक्षणप्रेमी,पालक वृंद, माजी विद्यार्थी, नागरीक उपस्थित होते.तसेच विद्यालयातील मुख्याध्यापक/प्राचार्य सारोक्ते सर,घाडगे सर, टाले सर,हंगे सर, यादव सर,येवले सर, चोपडे सर,तौर मॅडम, मुंडे सर, गोंदरे,पाखरे, काळे,ससाणे, आदी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.तसेच मराठी विभाग प्रमुख श्री. यादव सर यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व्यक्त केले व कार्यक्रमाची सांगता झाली.अशा या महान राष्ट्रपिता महात्मा गांधी व स्वातंत्र्य लढ्यातील थोर महान वीर वीरांगना देश स्वातंत्र्यासाठी आपल्या जीवनाची आहुती देणारे सर्व हुतात्मा प्रती विनम्र अभिवादन.



## प्रधानमंत्री घरकुल योजना अंतर्गत ११२९ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर

जालना। प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी नगर पंचायत कार्यालया अंतर्गत प्रधानमंत्री घरकुल योजना अंतर्गत तीर्थपुरी परिसरात ११२९ लाभार्थ्यांना शासनाकडून घरकुलाला मंजुरी मिळाली आहे अशी माहिती नगरपंचायत तीर्थपुरी कडून देण्यात आली आहे. शासनाची महत्वकांक्षी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत तीर्थपुरी शहरात ११२९ लाभार्थ्यांना घरकुल मंजुर झालेले असुन आज पर्यंत एक ही लाभार्थ्यांनी सदर योजने अंतर्गत बांधकाम परवानगी घेण्या संदर्भात अर्ज सादर केलेला नाही. करिता सदर योजनेतील सर्व लाभार्थ्यांना याद्वारे सुचीत करण्यात येते की, पुढील सात दिवसात पात्र लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी करून घेणे आवश्यक आहे कागदपत्रासह नगर पंचायत कार्यालयात अर्ज सादर करावे. जेणे करुन शासनाच्या महत्वकांक्षी योजनेचा लाभ सर्व लाभार्थ्यांना घेता येईल. पात्र लाभार्थ्यांनी विहीत मुदतीत अर्ज सादर न केल्यास सदर लाभार्थ्यांना घरकुलाची आवश्यकता नाही असे गृहीत धरुन घरकुल लाभार्थ्यांच्या यादीतुन नाव वगळण्याचा प्रस्ताव पाठविण्यात येईल असे कळविण्यात आले आहे.याची सर्व लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी. बांधकाम परवानगीसाठी लागणारी कागदपत्रे.आधार कार्ड मतदान कार्ड, बैंक पासबुक, महसुल विभागाकडील ७/१२, नगरपंचायतीचा नमुना ४३, मागील तीन वर्षाचे स्वताःच्या नावावर असलेल्या मालमत्तेची करभरणापावती. बांधकाम मंजुरीचा प्रस्ताव व नकाशा तसेच इतर अनुषंगीक कागदपत्रे सादर करावे.


**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२९/२०२५**

CNR No. MHBI020002512025

**दगडाबाई भ्र. त्रिंबक ढेंगे व इतर ४ वि. निरंक**

**(मार्फत ॲड.एन. सी. शिदे)**

अर्जदार : १. दगडाबाई भ्र. त्रिबक ढेंगे, वय ७३ वर्ष, धंदा घरकाम, रा. मौजवाडी ता. जि. बीड, २. वसंत पि. त्रिबक ढेंगे, वय ४८ वर्ष, धंदा शेती, रा. मौजवाडी ता. जि. बीड, ३. महानंदा भ्र, सातेराम मसवले, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. कारळवाडी ता. जि. बीड, ४. पंचकुला भ्र. नवनाथ भोगे, वय ५६ वर्ष, धंदा घरकाम, रा. ढेकणमोहा ता. जि. बीड, ५. पार्बती भ्र. महादेव यादव, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. गंगावाडी ता. गेवराई जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत त्रिंबक कान्हु ढेंगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे ज्याअर्थी मयत त्रिंबक कान्हु ढेंगे यांचा मृत्यु दिनाक ०५/०३/२०२४ रोजी राहते घरी मौजवाडी ता. जि बीड येथे त्याचा मृत्यु झाला वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयत्ताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा व अर्जदार क्र. ३ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई-वडील या पुर्वीच मयत झाले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत त्रिंबक कान्हु ढेंगे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व इंतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरील अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नाहीत अस कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख २७/०२/२०२५ आज दिनांक २८ माहे जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

स्वाक्षरित/-
**क. लिपीक**

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड


## शाहू महाराजांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य तळागाळातील व्यक्तींसाठी महत्त्वपूर्ण होते-डॉ. राजेश करपे

बीड। प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालय बीड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ,छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास विभाग द्वारा राजर्षी शाहू व्याख्यानमालेचे दिनांक/१/२०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर, मार्गदर्शक मा.डॉ.राजेश करपे ( इतिहास विभाग प्रमुख, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण ), विद्यार्थी विकास मंडळाच्या प्रमुख डॉ. चित्रा धामणे यांचे विचार मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आणि कुंडीमध्ये वृक्षारोपण करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाची बी .ए.तृतीय वर्षाची विद्यार्थिनी प्राजक्ता कुलकर्णी हिने सुस्वागतम हे स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास मंडळाच्या प्रमुख डॉ. चित्रा धामणे यांनी केले. कार्यक्रम आयोजनाचा मुख्य हेतू आणि राजश्री शाहू महाराजांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची विद्यार्थिनींना सखोल माहिती व्हावी या अनुषंगाने या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे अशी मांडणी आपल्या प्रास्ताविकातून केली.



व्याख्यानमालेचे मार्गदर्शक मा.डॉ.राजेश करपे यांनी सर्वप्रथम एकोणिसाव्या शतकामध्ये झालेल्या अनेक सामाजिक आणि आर्थिक चळवळी याची उकल केली. तसेच सती प्रथा महिलांसाठी आणि समाजासाठी कशी विघातक होती याची साधारण माहिती दिली. याचबरोबर महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. तत्कालीन समाजामध्ये असणारी वर्णव्यवस्था आणि शिक्षण व्यवस्था याची उकल केली.सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये महिलांच्या शिक्षणासाठी उचललेले पाऊल यामुळेच महिलांचा विविध क्षेत्रांमध्ये सहभाग आणि त्यांचे उल्लेखनीय कार्य आपल्याला पहावयास मिळते. राजश्री शाहू महाराजांची कोल्हापूर संस्थानातील समाज उपयोगी कार्य याची सविस्तर मांडणी केली. त्यांनी केवळ प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचेच केले नाही तर जे पालक आपल्या पाल्याला शाळेमध्ये पाठवणार नाहीत त्यांना एक रुपया दंड देखील आकारला होता. याचबरोबर शाहू महाराजांनी शिक्षणाचा विस्तार व्हावा, सर्वांना शिक्षण घेता यावे यासाठी व्हिक्टोरिया बोर्डिंगची स्थापना केली. त्यानंतर अनेक वस्तीग्रह स्थापन करून मुलांची शिक्षणाची व्यवस्था आणि सुविधा प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शाहू महाराजांनी केले. राजर्षी शाहू महाराजांची प्रगत विचारसरणी आणि त्यांनी राबविलेली धोरणे खरोखरच उल्लेखनीय अशीच आहेत. १९०२ मध्ये देशातला पहिला आरक्षणाचा कायदा राजश्री शाहू महाराजांनी केला. याचबरोबर अस्पृश्यता निवारणासाठी केलेले कार्य याची सोदाहरण मांडणी केली. याशिवाय आंतरजातीय विवाह लावून देण्यास केलेली सुरुवात आणि त्यासाठी केलेली आर्थिक मदत देखील उल्लेखनीय अशीच आहे. यावरून असे वाटते की, राजर्षी शाहू महाराज बोलके सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते त्याचबरोबर बरोबर राजर्षी शाहू महाराज , महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याला उजाळा दिला. सध्या परिस्थितीमध्ये जातीयतेची किनार वाढत आहे ही बाब गंभीर आहे. राजश्री शाहू महाराजांच्या चरित्रातून जात ,धर्म ,पंथ बाजूला सारून आपण सर्वधर्मसमभावाने एकत्र आले पाहिजे असा मनोदय मार्गदर्शनातून व्यक्त केला.व्याख्यानमालेच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी शाहू महाराजांनी केलेले सक्तीचे शिक्षण याविषयी याविषयी मार्गदर्शन केले. शाहू महाराजांना आरक्षणाचे जनक मानले जाते. ते त्यांनी केलेल्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यामुळे होय. समाजात वावरण्यासाठी अडाणी राहून चालणार नाही तर शिक्षण अतिशय महत्वाचे आहे असे शाहू महाराज नेहमी सांगत. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य उल्लेखनीय असेच आहे याची सविस्तर आणि सोदाहरण मांडणी प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांनी केली. महाविद्यालयाच्या परंपरेनुसार आलेल्या पाहुण्यांना महाविद्यालयाच्या मा.प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांच्या हस्ते ग्रंथभेट देण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी नंदिनी व्हावळ हिने केले तर आभार सुप्रिया यादव हिने मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी, जिज्ञासा करिअर अकॅडमी च्या विद्यार्थिनी, आणि महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सभापती प्रा. राम शिंदे व सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी यांच्या हस्ते आज गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार वितरण सोहळा



आष्टी । प्रतिनिधी

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी-पाटोदा-शिरूर तालुक्याचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ भगवान महाविद्यालयाच्या वतीने आयोजित गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार वितरण सोहळा आज शनिवार दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वा. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती मा. प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव डॉ. अजय दादा धोंडे व प्रसिद्ध सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी दिली.

यावेळी सामाजिक, शैक्षणिक, कृषी, पत्रकारिता, अध्यात्म, प्रशासन, कला, क्रिडा, उद्योग अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांना गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे.

त्यानंतर दुपारी ४ वाजता खुल्या लावणी नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या लावणी नृत्य स्पर्धेसाठी ११ हजार रुपये, ९ हजार रुपये, ७ हजार रुपये अशी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची बक्षिसे तसेच उत्तेजनार्थ ३ हजार एक रुपयांचे रोख बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.

तरी सर्व पुरस्कार प्राप्त व्यक्ती व लावणी नृत्य स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या कलावंतांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उपप्राचार्य प्रा. डॉ. ज्ञानदेव वैद्य, उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके, उपप्राचार्य सुनिल भवर, प्रा. डॉ. बाळासाहेब गावडे, प्रा. डॉ. आबासाहेब पोकळे, प्रा. डॉ. वंदना घोडके यांच्यासह संयोजन समिती सदस्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जागतिक पर्यटनाच्या नकाशावर 'केसापूरी' चे नाव यावे ही भावना - आ.प्रकाश सोळंके

## मंदिर जीर्णोद्धारासाठी साडेअकरा कोटी रुपयांचा निधी



माजलगाव । प्रतिनिधी

शहरालगत असलेल्या केसापुरी येथील चालुक्य कालीन केशवराज मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी साडे अकरा कोटी रुपये निधी मंजूर असून मंदिर बांधकाम शुभारंभ आ.प्रकाश सोळंके यांच्या हस्ते दि ३१ जानेवारी शुक्रवार रोजी संपन्न झाला.

यावेळी बोलताना आ.सोळंके म्हणाले की,पूर्व इतिहास असलेल्या या मंदिराचा ठेवा जपण्यासाठी जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने या मंदिराची पुन:उभारणी करण्यात येतेय याचा मला आनंद आहे.गर्भ गृह, अंतरा,मुख मंडप,अर्ध मंडप आणि सभागृह अशा पद्धतीने मंदिराची रचना असणार आहे.गावकऱ्यांनी घरचं कार्य म्हणून या कामाची जबाबदारी घेत दर्जेदार काम करून घेण्याबाबत विनंती यावेळी केली.पुढील दोन वर्षांमध्ये हे काम पूर्णत्वास गेल्या नंतर पर्यटकांच्या वर्दळीमुळे पर्यटनाला चालना मिळेल आणि परिसरातील नागरिकांना रोजगाराचे संसाधने निर्माण होतील.

# एसबीआय बँकेतून दोन लाखांची रोकड लंपास; न.प.ची रक्कम चोरीला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेतून अज्ञात चोरट्याने दोन लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली आहे. सदर रक्कम अंबाजोगाई नगर परिषदेची होती.**



मंगळवारी (दि. ३०) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास नगर परिषदेतील कर्मचारी भिकाजी दामोदर शिंदे चालानची रक्कम बँकेत भरण्यासाठी गेले होते. त्यांनी पैशांची बॅग बँकेतील टेबलावर ठेवली होती. याचवेळी अज्ञात चोरट्याने शिंदे यांची नजर चुकवत बॅग लंपास केली. चोरी झाल्यानंतर शिंदे यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.

सीसीटीव्ही फुटेज मिळाले नाही!

पोलिसांनी बँकेत येऊन तपास सुरू केला. मात्र, बँकेतील सीसीटीव्हीच्या केबल उंदराने कुरतडल्याने फुटेज मिळू शकले नाही. त्यामुळे चोरट्याचा तपास अधिक कठीण झाला आहे. या घटनेमुळे बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महावितरणामधील कायमस्वरूपी विजपुरवठा खंडीत केलेल्या ग्राहकांनी महावितरण अभय योजनेचा लाभ घ्यावा -शेख अमीर मदनी

बीड । प्रतिनिधी

सद्यस्थितीत महावितरणाच्या वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांकडे लक्षणीय थकबाकी प्रलंबित आहे. सदर थकबाकी वसूल करणे विविध समस्यांकडे आव्हानात्मक बनले आहे. अनेक नवीन येणारे जागा मालक / रहिवासी यांना त्या जागेवरील थकबाकीमुळे नवीन वीज पुरवठा मिळण्यात अडचणी येत आहेत. असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असणारे ग्राहक हे अनधिकृतरित्या वीज वापरत असल्याचे निदर्शनात आले आहेत. अशा ग्राहकांकरीता दि.१ सप्टेंबर २०२४ पासून महावितरण अभय योजना सुरू करण्यात आली आहे.



योजनेकरिता पात्रतेचे निकष : दिनांक ३१/०३/२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित केलेले सर्व उच्चदाब व लघुदाब ग्राहक (कृषी व सार्वजनिक पाणीपुरवठा ग्राहक वगळुन) या योजनेत सहभागी होण्यास पात्र असतील. या योजनेसाठी ३१ मार्च २०२४ पर्यंतची थकबाकी निश्चित करण्यात आली आहे. वितरण फ्रॉचायझी क्षेत्रातील महावितरणाच्या काळातील कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित झालेले थकबाकीदार ग्राहक देखील या योजनेत सहभागी होण्यास पात्र आहेत.

योजनेचा फायदा : १) कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडीत असलेल्या ग्राहकांनी संपूर्ण मुळ थकबाकी (मुद्दल) भरल्यास १००% वीज आणि विलंब आकार माफ केले जाईल.

२)ग्राहकांना थकबाकीची देय रक्कम १००% एकरकमी भरण्याचा किंवा किमान ३०%

डाऊनपेमेंटसह जास्तीत जास्त ०६ हफ्त्यांमध्ये भरण्याचा पर्याय उपलब्ध असेल. ३) लघुदाब ग्राहकांनी मुळ थकबाकी एकरकमी भरल्यास त्यावर १०% अतिरिक्त सवलत मिळेल.

परंतु कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहक हे गैरमार्गाने वीज पुरवठा वापर करत आहेत त्यांच्या विरोधात अलीकडेच ◀◀ पान ३ वर

# पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांचा भाऊसाहेब घुगे यांच्या निवासस्थानी आज सत्कार सोहळा

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या पर्यावरण व वातावरणीय बदल ,पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे ह्या शनिवारी ( ता. ०१) जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून दुपारी ०२.०० वा.नवीन मोंढा मार्गावरील श्रीकृष्ण- रुख्मिणी नगर परिसरातील शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या " नाथ- पर्व " निवासस्थानी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे .अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी दिली.



पालकमंत्री पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर ना. पंकजाताई मुंडे ह्या जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजन समिती तसेच जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या बैठका घेणार आहेत. तदनंतर नाथपर्व येथे सदिच्छा भेट देतील. यावेळी शिवसेना उपनेते, आ. अर्जुनराव खोतकर, आ. हिकमत उढाण,जिल्हा संपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर यांच्या उपस्थित ना. पंकजाताई मुंडे यांचा सत्कार सोहळा पार पडणार आहे. आपल्या चाहत्यांसमवेत त्या संवाद साधणार असून महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ना. मुंडे समर्थकांनी मोठ्या संख्येने सत्कार सोहळ्यास उपस्थित रहावे असे आवाहन भाऊसाहेब घुगे यांनी केले आहे.

# माजलगाव कृ.ऊ.बा.समितीचे कर्मचारी सुरेश टाकणखार सेवानिवृत्त

**माजलगाव । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे कनिष्ठ लिपिक सुरेश टाकणखार हे दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी शासन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यांनी ३९ वर्ष सेवा दिली त्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम बाजार समिती कार्यालयामध्ये ३१ जानेवारी रोजी ०४: ०० वाजता संपन्न झाला या निरोप समारंभाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे,उपसभापती श्रीहरी



(नाना) मोरे,संचालक नंदकिशोर सजगणे,अमोल जाधव बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे हे उपस्थित होते व यावेळी सुरेश टाकणखार यांचा आहेर व अंगठी देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला यावेळी सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा.श्रीकांत शिंदेच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे भगवा सप्ताहाचे आयोजन - येवले, सोळंके, कोंबडे

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते ना.एकनाथ रावजी शिंदे,खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना सचिव संजय मोरे, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, संपर्क नेते आमदार अर्जुन खोतकर, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या आदेशाने माजलगाव येथे दिनांक ०४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी दरम्यान माजलगाव शिवसेना,युवासेना महिला आघाडीच्या वतीने भगवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे अशी माहिती शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके, युवासेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख शारदा डोईजड यांनी दिली आहे.





भगवा सप्ताहाची सुरुवात मंगळवार दिनांक ०४ फेब्रुवारी रोजी माजलगाव चे ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिर येथे महाआरती करून सुरुवात होणार आहे.या महाआरतीचे आयोजन युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे यांनी केले आहे. बुधवार दिनांक ०५ फेब्रुवारी रोजी माजलगाव शहरातील सर्व मंदिरातील पुजारी यांचा सत्कार व सन्मान या ठिकाणी करण्यात येणार आहे.याचे आयोजन रामेश्वर काशीद यांनी केली आहे.गुरुवार दिनांक ०६ फेब्रुवारी रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालय येथे कराटे स्पर्धेचे आयोजन या ठिकाणी विकास झेटे यांनी केलेला आहे.शुक्रवार दिनांक ०७ फेब्रुवारी रोजी किंग्स डान्स स्टुडिओमध्ये डान्स स्पर्धेचे आयोजन शारदा डोईजड यांनी केलेला आहे. शनिवार दिनांक ०८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:०० वाजता दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फराळ वाटपाचा आयोजन माऊली कदम यांनी केले आहे रविवार दिनांक ०९ फेब्रुवारी रोजी शासकीय रुग्णालय माजलगाव येथे जन्मलेल्या नवजात बाळांना बेबी किट व खंडोबा मंदिर येथे महाआरतीचा आयोजन शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी केले आहे सोमवार दिनांक १० फेब्रुवारी रोजी सकाळी १०:०० वाजता वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन मोरेश्वर माध्यमिक विद्यालय शाहूनगर माजलगाव येथे तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी केले आहे तरी माजलगाव तालुक्यातील व शहरातील सर्व शिवसैनिकांनी युवा सैनिकांनी भगवा सप्ताहाच्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहावे असे आवाहन तालुका प्रमुख तुकाराम येवले व शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी केले आहे.

# काव्यवाचनमध्ये भालेराव व मोहिते यांना विभागून प्रथम तर वक्तृत्व मध्ये उशिरे व भांड यांना प्रथम क्रमांक विभागून

आष्टी । प्रतिनिधी

येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूर चे मा. आ. भीमराव धोंडे यांच्या आई - वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ भगवान महाविद्यालय आष्टीच्या वतीने आयोजित गंगाई - बाबाजी महोत्सवातील आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत महेश उशीर (न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर) व गोविंद भांड (बी.जी.एस. महाविद्यालय, पुणे) यांनी प्रथम क्रमांक विभागून (रोख ७००१ रुपये, सन्मानचिन्ह) तर द्वितीय क्रमांक अनिकेत डमाळे (न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर) व प्रमोद भालेराव (गोखले इन्स्टिट्यूट, पुणे) यांना विभागून (५००१ रुपये व सन्मानचिन्ह) तर तृतीय क्रमांक आकाश बोडखे (मालपाणी महाविद्यालय, संगमनेर) व स्वाती पोकळे (पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय, आष्टी) यांना विभागून (रोख ३००१ रुपये व सन्मानचिन्ह) देण्यात आले




वक्तृत्व स्पर्धेसाठी १) शेतकऱ्यांच्या मुलांचे लांबलेले विवाह..एक सामाजिक समस्या, २) नीती मूल्यांचा वाढता ऱ्हास आणि सामाजिक जीवन, ३) ईव्हीएम वरील मतदारांच्या मनातील वाढती साशंकता हे विषय देण्यात आले होते. परीक्षक म्हणून प्रा. डॉ. अनिल गर्जे, डॉ. राजाराम सोनटक्के, व डॉ. गोपीनाथ बोडखे यांनी काम पाहिले. आंतर महाविद्यालयीन काव्यवाचन स्पर्धेत प्रमोद भालेराव (गोखले इन्स्टिट्यूट, पुणे) व आकाश मोहिते (न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर) यांना प्रथम क्रमांक विभागून ( रोख ७००१ रुपये व सन्मानचिन्ह) सृष्टी लोखंडे (एम.पी. लॉ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर) व राजश्री जाधव (कालिका देवी महाविद्यालय, शिरूर) यांना द्वितीय क्रमांक विभागून (रोख ५००१ रुपये व सन्मानचिन्ह) तर तृतीय क्रमांक आकाश बोडके (मालपाणी महाविद्यालय, संगमनेर) व गोविंद भांड (बी.जी.एस. महाविद्यालय, पुणे) यांना विभागून (रोख ३००१ ◀◀ पान ३ वर

# रोजगार मेळाव्यात १२० उमेदवारांची निवड

जालना । प्रतिनिधी

जालना तरुण-तरुणी देशाचे भवितव्य आहे व आजच्या तरुणांना कौशल्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत रोजगाराची संधी मिळाली पाहिजे तरच देशातील तरुण स्वत:चा विकास करून देशाचाही विकास करेल, अद्यापपर्यंत आपण जे शिक्षण आत्मसात केले आहे. त्याचे आज जीवनातील जीवन जगणे चे म्हणजेच नोकरी मिळणार आहे. असे प्रतिपादन जे.ई.एस. कॉलेज उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते यांनी केले. जिल्हा विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व जे.ई.एस. महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दि २९ जानेवारी रोजी बेरोजगार तरुणांसाठी जालना येथील जे.ई.एस.

उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी से बोलत होते.




प्रास्ताविकात जिल्हा कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त गणेश चिमणकर कार्यालयामार्फत तरुणांना यांनी विविध रोजगार स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात यावेळी २४१ जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत आणि उद्योजकांना मनुष्यबळाची आवश्यकता भासत असते त्यासाठी बेरोजगार तरुणांसाठी शासनामार्फत हा हा प्लॅटफॉर्म प्ल उपलब्ध करून देण्यात आला आहे. या प्लॅटफॉर्म अंतर्गत जिल्ह्यातील अनेक युवक-युवतींना रोजगार प्राप्त होतो आहे. असेही सांगितले. रोजगार मेळाव्यात १० नामांकित कंपनीचे प्रतिनिधी सहभागी झाले मुलाखतीतून १२० उमेदवारांची विविध पदाकरिता प्राथमिक निवड केली. यात एस आर जे स्ट्रिप्स अँड पाईप्स ७, कृषिधन सीड्स २८, मातोश्री स्किल डेव्हलपमेंट ◀◀ पान ३ वर

# पारंपारिक लोककला जीवंत ठेवण्याची गरज - डॉ.संजय देशमुख

## लोककला संवर्धन राष्ट्रीय परिषद उत्साहात

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**लोककलांच्या माध्यमातून प्रबोधन व मनोरंजन होते त्या पारंपारिक लोककला जिवंत ठेवण्याची जबाबदारी सर्वांचीच असून लोककला ही मराठी संस्कृतीचा आत्मा आहे.असे मत पुणे येथील लोककलेचे अभ्यासक व लोककला संवर्धन परिषदेचे बीजभाषक डॉ.संजय देशमुख यांनी व्यक्त केले. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर आणि योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित,स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचा नाट्यशास्त्र विभाग आयोजित लोककला संवर्धन राष्ट्रीय परिषदेत बोलत होते.**

अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते.मंचावर आंतरराष्ट्रीय किर्तीचे पखवाजवादक उद्धव आपेगांवकर,के.एस.के. महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.संजय पाटील देवळाणकर, प्राचार्य डॉ.पी.आर. थारकर,नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संपदा कुलकर्णी आदी उपस्थित होते.पुढे बोलताना देशमुख म्हणाले की,दुर्मिळ अशा लोककलेचे संवर्धन करणारे कलावंत देखील उपेक्षित आहेत आगामी



काळात शासनाच्या माध्यमातून राजाश्रयाची गरज आहे.

उद्धव आपेगावकर यांनी सांगितले की,संगीत,नृत्य,नाट्य, व लोककलेचे जतन केल्यासच देशाच सांस्कृतिकपण टिकून राहिल आणि देशाचे व कलावंतांचे महत्व वाढेल.संजय पाटील म्हणाले की,या नाट्यशास्त्र विभागाने लोककला परिषद घेऊन एक नवा आयाम प्रस्थापित केला आहे पुढील काळातही अशा लोककला परिषदांची गरज आहे. ◀◀ पान ३ वर

# संविधानाचा उदय' हे महानाट्य सादर करत श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विविध संस्थांच्या विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने संविधानाचा उदय हे महानाट्य सादर करत देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू व्हिजन पब्लिक स्कुल, कॉलेज ऑफ फार्मसी, कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स , अध्यापक विद्यालय व महाविद्यालय, मानव विकास निवासी मूकबधिर, अपंग, तथा मतिमंद विद्यालय, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,



त्याचबरोबर घाट नागनाथ प्राथमिक विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी "संविधानाचा उदय" या महानाट्यमध्ये आपला सहभाग नोंदवला होता. अंबाजोगाई शहरातील मोदी लर्निंग सेंटर येथे मंडळाचा मुख्य ध्वजारोहण सोहळाची सुरुवात संस्थेचे मार्गदर्शक प्रा वसंत चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करून झाली. यावेळी संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, जेष्ठ मार्गदर्शक प्रा डी एच थोरात, कार्यकारी संचालक संकेत मोदी, डॉ नवनाथ घुगे, ऍड संतोष पवार पत्रकार दत्तात्रय आंबेकर यांच्यासह बालाजी शिक्षण ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून मी पुन्हा येईन... ची रीघ ओढत फडणवीसांची तुफान फटकेबाजी




पुणे । प्रतिनिधी

शहरातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर तिसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलन २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या साहित्य संमेलनाच्या उद्घाटनासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या उपस्थित पार पडले. या संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना साहित्य भूषण पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले.

साहित्य संमलनाच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका चिमुऱ्याड्याने मी पुन्हा येईल, असे म्हणाल्याची आठवण सांगितली. यावेळी ते म्हणाले मी पुन्हा येईल माझा पिच्छा सोडत नाही. अलीकडच्या काळात चांगले म्हणतात. मागच्या काळात उपहासाने म्हणत होते. शेवटी एखादा शब्द आपल्याला चिपकतो. पण काळ आणि वेळ याप्रमाणे त्याचे अर्थ बदलत असतात, असे फडणवीस यावेळी म्हणाले. पण तुम्ही सगळ्यांनी हे ठरवलं पाहिजे की, जेव्हा जेव्हा विश्व मराठी संमेलन होईल तेव्हा तेव्हा मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, अशी तुफान फटकेबाजी देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना केली. या त्यांच्या वाक्यवर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला होता.

यावेळी बोलताना फडणवीस यांनी मराठी भाषेला मिळालेल्या अभिजात दर्जानंतर पहिले संमेलन असल्यामुळे पंतप्रधान नरेंद मोदी यांचे आभार मानले. मराठीचा विचार करताना स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचाराशिवाय ते पूर्ण नाही. दिल्लीत साहित्य संमेलनाच्या कार्यालयाचे उद्घाटन आम्ही केले ही देखील आनंदाची गोष्ट आहे. मी स्वतःला भाग्यवान समजत असल्याचे फडणवीस म्हणाले.

## एआयचा वापर करावा

आज सगळीकडे एआयचा बोलबाला पाहायला मिळत आहे. या तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसारासाठी वापर केला पाहिजे. एआय युगात जर आपण स्मॉल लँग्वेज मॉडेलमध्ये सर्व साहित्यकांचे साहित्य टाकले. तर येणाऱ्या पिढीला साहित्यकांनी काय लिहिले आहे, हे समजेल. त्यासाठी मराठी भाषा विभागाने एआयचा वापर करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना केले.

## तीन दिवस विविध कार्यक्रमांची मेजवाणी

तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळणार आहे. मराठी भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी वाहिलेल्या संमेलनात कवी संमेलन, परिसंवाद, बालसाहित्यावर चर्चा, कार्यशाळा, चर्चासत्र, मराठी भाषेशी संबंधित सादरीकरण यांच्यासोबतच दररोज सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे.

# राजगुरुनगरला भाडेवाढीवरुन रास्ता रोको



खेड । प्रतिनिधी


सरकारने एसटी बस प्रवासात केलेली दरवाढ तत्काळ मागे घ्यावी, या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने राजगुरुनगर येथे पुणे-नाशिक महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व आमदार बाबाजी काळे यांनी केले.

एकीकडे महागाईला तोंड देत असताना राज्य सरकारने एसटी बस प्रवास दरात १४.९७ टक्के भाडेवाढ केली आहे. ती सर्वसामान्य नागरिकांना न परवडणारी आहे. राज्यभर या दरवाढीचा निषेध केला जात आहे. राजगुरुनगर येथे देखील निषेध नोंदविण्यात आला. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अशोक खांडेभराड, तालुकाप्रमुख रामदास धनवटे, महिला जिल्हा संघटिका विजया शिंदे, माजी तालुकाप्रमुख सुरेश चव्हाण, महिला आघाडी तालुकाप्रमुख उर्मिला सांडभोर, ग्राहक संरक्षण कक्ष जिल्हाध्यक्ष बाळासाहेब ताये, युवासेनेचे मृण्मय काळे, बी. के. कदम, शहरप्रमुख संतोष राक्षे, राहुल मलघे, चैतन्य गायकवाड, पूनम पोतले, सरपंच माऊली कड आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

आमदार काळे म्हणाले, एसटी बसमधून सुविधा मिळत नाही. खिळखिळ्या बसने सर्वसामान्य नागरिक प्रवास करीत आहेत. बसस्थानकांमध्ये सोयीसुविधा मिळत नाहीत, तरीही ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी एसटीने प्रवास करीत आहेत. असे असताना सरकारने भाडेवाढ केली आहे. ही भाडेवाढ चुकीची आहे, सर्वसामान्य माणसाला ती न परवडणारी आहे. सरकारने भाडेवाढ तत्काळ मागे घ्यावी. मागण्यांचे निवेदन खेड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रभाकर मोरे यांना देण्यात आले. या आंदोलनामुळे वाहतूक कोंडी झाली होती. आंदोलन संपल्यानंतर पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली.

# वाघोलीतील ३००० नागरिकांनी घेतले श्री महाकालेश्वराचे दर्शन ! शिवदास उबाळे, वसुंधरा उबाळे यांचा उपक्रम





वाघोली : खराडी आणि वाघोली परिसरातील नागरिकांसाठी मोफत श्री महाकालेश्वर तथा उज्जैन यात्रेचे आयोजन वाघोलीच्या सरपंच तथा माजी सभापती पंचायत समिती हवेली वसुंधरा उबाळे व माजी सरपंच शिवदास उबाळे यांच्या परिवाराकडून आयोजित करण्यात आले होते. उपक्रमाची वाघोलीत मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागली होती. ३००० हजार नागरिकांनी श्री महाकालेश्वर चे मोफत दर्शन घेतले.

वाघोली तालुका हवेली येथील पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीचे पडघम सध्या वाजू लागले आहेत. सामाजिक उपक्रम राबवून आपली वेगळी ओळख निर्माण करणारे उबाळे कुटुंबीय यांनी राबवलेल्या उपक्रमाबद्दल नागरिकांकडून आभार व्यक्त केले जात आहे. देशाचे नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, उपमुख्यमंत्री अजित पवार या पवार कुटुंबीयांबरोबर अनेक वर्षापासून ऋणानुबंधाचे संबंध असलेल्या उबाळे परिवाराने मोफत उज्जैन यात्रा नागरिकांसाठी उपलब्ध केल्याने आगामी होणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत या उज्जैन यात्रेचा प्रभाव पडू शकतो अशी चर्चा मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे.

सध्या माजी सरपंच शिवदास उबाळे आणि माजी सरपंच वसुंधरा उबाळे या कुटुंबीयांकडून राबवलेल्या उपक्रमाची वाघोलीत मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागली आहे. वाघोली आणि खराडी मधील नागरिकांनी जास्तीत जास्त श्री महाकालेश्वर यात्रेचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी सरपंच शिवदास उबाळे यांनी केले आहे.

# खासगी टँकरमधून घरी येणारं पाणी दूषित; जीबीएस रोगाचा धोका, १५ पॉईंटवर कारवाई




पुणे : राज्यात गेल्या काही दिवसांपासून जीबीएस रोगाचा प्रादुर्भाव जाणवत असून पुणे जिल्ह्यात सर्वाधिक रुग्ण आढळून आले आहेत. तर, सोलापुरात जीबीएसचा (त्रङ्ड) पहिला रुग्ण दगावला होता, ज्यास पुण्यातूनच संसर्ग झाला होता. आता, पुणे शहरात गुलेन बॅरी सिंड्रोम (त्रींळश्रश्ररळप इरींीश डूपवीोश)च्या आणखी एका रूग्णाचा मृत्यू झाला असून पुण्यातील (झींपश) रुग्णाचा हा तिसरा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यातील नांदेडगाव परिसरातील ६५ वर्षीय नागरिकाचा मृत्यू झाला. या रूग्णावर गेल्या १५ दिवसांपासून ससून रुग्णालयात उपचार सुरू होते. त्यामुळे, पुणे महापालिकेकडून काळजी घेण्यात येत असून नागरिकांनाही आवाहन केलं जात आहे. त्यातच, आता पुण्यातील खासगी टँकरमधून येणारं पाणी हे आरोग्यासाठी घातक असून त्यातूनही जीबीएसची लागण होण्याचा धोका असल्याचं पुणे महापालिकेनं म्हटलं आहे.

पुण्यातील नांदेडगावात अनेक रुग्ण हे जीबीएस बाधित आहेत, त्यातील एका रुग्णाचा आज मृत्यू झाला. पुण्यातला तिसरा आणि राज्यातला चौथ्या जीबीएस बाधित रुग्णाचा मृत्यू झाला झाल्याने आता चिंता वाढली आहे. तर पुणे शहरामध्ये नांदेडगाव, सिंहगड रस्ता परिसर या ठिकाणी जास्त प्रमाणामध्ये जीबीएस बाधित रूग्ण आढळून आले आहेत. खासगी टँकरने दिल्या जाणारं पाणी धोकादायक असल्याचं महापालिकेच्या तपासातून समोर आलं आहे. पुणे शहरात टँकर भरण्याच्या सगळ्या १५ पॉईटवरून टँकरने होणारा सगळा पाणीपुरवठा दूषित आहे. या खासगी टँकरच्या पाण्यात कॉलिफार्म आणि इ-कोलाय बॅक्टेरिया आढळून आला आहे. कॉलिफार्म आणि इ-कोलाय बॅक्टेरिया मानवाच्या शरिरासाठी घातक असल्याचं पुणे महापालिकेनं म्हटलं आहे. जीबीएस रोगाचा प्रादुर्भाव होण्यास या टँकरमधील पाण्याने निमंत्रण मिळत असल्याचं पाहायला मिळत आहे. पुणे शहरातील सिंहगड रस्ता परिसरातील धायरी, किरकटवाडी, नांदेड तसेच डीएसके विश्व परिसरातील हे ट्रँकर पॉईंट आहेत.

पुण्यातील सिंहगड रस्ता परिसरातील धायरी, किरकटवाडी, नांदेड तसेच डीएसके विश्व परिसरातील खासगी ट्रँकरने अनेक भागांत पाणी पुरवलं जातं. या भागात पाणी पुरविणाऱ्या सर्व १५ टँकर भरणा केंद्राच्या बोअरवेलच्या पाण्यात दूषीत पाण्यात आढळणारा कॉलिफॉर्म आणि ई-कोलाय हा बॅक्टेरीया सापडला आहे. हे दोन्ही बॅक्टेरिया माणसाच्या शरिरासाठी अत्यंत घातक आहे. त्यामुळे, जीबीएस रोगाचा प्रादुर्भाव किंवा आजारासारखी लक्षणे उद्भवू शकतात. पुणे महापालिकेकडून आज सिंहगड रस्ता परिसरातील धायरी, किरकटवाडी, नांदेड आणि डीएसके विश्व परिसरातील १५ टँकर भरणा केंद्राच्या पाण्याची तपासणी करण्यात आली होती. त्यात हे बॅक्टेरिया पाण्यात असल्याचं समोर आलंय. त्यामुळे, आता या ट्रँकर पॉईंटवर कारवाई होण्याची शक्यता आहे. या सर्व केंद्राना महापालिकेकडून तातडीनं नोटीस बजाविण्यात येणार आहे. कारण, हे पाणी पिण्यायोग्य असून आरोग्यासाठी धोकादायक असल्याचा निष्कर्ष महापालिकेच्या आरोग्य विभागाने काढला आहे.

# ओला - सुका कचरा विलगीकरण करू या!



पथनाट्य करणारे पथनाट्य सादर करण्यात आले. ओला सुका हा कचरा, विलगीकरणं करू या! पिंपरी चिंचवडला नंबर वन करू या! असे म्हणत महापालिकेच्या कचऱ्याच्या गाडीसमोर पथनाट्याला सुरुवात झाली.

पथनाट्यामध्ये मानवी हक्क संरक्षण आणि जागृतीचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष आण्णा जोगदंड, दिलासा संस्थेचे अध्यक्ष सुरेश कंक,प्रकाश घोरपडे, संगीता जोगदंड, सुभाष चव्हाण, मुरलीधर दळवी, शामराव सरकाळे आणि महात्मा गांधी यांच्या वेशभूषेत डॉ. पी. एस. आगरवाल यांनी सहभाग घेतला होता.

अण्णा जोगदंड म्हणाले.. काचा, ब्लेड, धारदार वस्तू या कचऱ्यात टाकू नयेत. तर ते स्वतंत्र घंटागाडीतील सेवकांच्या हातात द्यावे. त्याच कचऱ्याच्या गाडीवर एक महिला सफाई कामगार बसलेली असते याचा विचार करावा.महात्मा गांधी झालेले डॉक्टर पी एस आगरवाल म्हणाले शरीराच्या स्वच्छतेबरोबर माणसाच्या मनाची स्वच्छता आजच्या काळात होणे आधिक गरजेचे आहे. आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता पाळणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे. उपायुक्त सचिन पवार म्हणाले, घातक कचरा, सुका, ओला कचरा वेगळा करून पालिकेला सहकार्य करावे काही नागरी समस्या असतील तर जरूर सांगावे.आम्ही सर्वजन मदत करण्यास तयार आहोत.

यावेळी मराठवाडा जन विकास संघाचे अध्यक्ष अरुण पवार ,ड प्रभागाचे सहाय्यक आरोग्य अधिकारी शांताराम माने, आरोग्य निरीक्षक स्नेहल कांबळे, रश्मी तुंडलवार, शंकर घाटे व इतर कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. महिला कर्मचारी गंगुबाई अलजेंडे यांचा सत्कार करण्यात आला. आभार सुखदेव लोखंडे यांनी मानले. महात्मा गांधी यांना समर्पित आदरांजली आणि राष्ट्रगीत म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाळुंगे परिसरात दोन अपघात; तिघे जखमी

**पिंपरी । प्रतिनिधी**

महाळुंगे येथे अपघाताच्या दोन घटना घडल्या असून, यामध्ये तिघे जखमी झाले आहेत. याप्रकरणी महाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पाईट ते शिरोली रोडवर झालेल्या अपघातात हरिभाऊ मोहन भोकसे (वय ५१), मालन हरिभाऊ भोकसे (वय ४०, कुरकुंडी, खेड) हे जखमी झाले.

याप्रकरणी हरिभाऊ यांचा मुलगा ज्ञानेश्वर याने महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार दुचाकी चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हरिभाऊ आणि त्यांच्या पत्नी मालन हे दुचाकीवरून जात असताना आरोपी दुचाकी चालकाने त्याच्या ताब्यातील दुचाकीने हरिभाऊ यांच्या दुचाकीला समोरून धडक देत अपघात केला. अपघात झाल्यानंतर आरोपी दुचाकीस्वार पळून गेला. अपघाताची दुसरी घटना महाळुंगे गावात तळेगाव-चाकण रोडवर घडली. यामध्ये जिशान मुस्ताक पटेल (३१, रा. नाणेकरवाडी, खेड) हे जखमी झाले आहेत. त्यामध्ये रवींद्र बाळासाहेब मोहिते (३२, रा. पिंपरी ठाकरी, खेड) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पटेल यांच्या दुचाकीला मोहिते याने त्याच्या ताब्यातील दुचाकीने जोरात धडक दिली. त्यामध्ये पटेल हे गंभीर जखमी झाले आहेत. पुढील तपास महाळुंगे पोलीस करत आहेत.

# शिरूरमध्ये मांडूळ साप घेऊन फिरणारे दोघे अटक, तर साप वनविभागाच्या ताब्यात





शिक्रापूर : शिरुर शहरामध्ये बेकायदेशीरपणे मांडूळ जातीचा साप घेऊन फिरणाऱ्या दोघांना शिरुर पोलिसांच्या पथकाने अटक करत मांडूळ साप जप्त करुन वनविभागाच्या ताब्यात दिले आहे. देवदास ईमराज भोसले व धनेश्वर दुर्यभान भोसले असे पोलिसांनी अटक केलेल्या दोघांची नावे आहे.

शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलीस हवालदार विजय शिंदे, सचिन भोई, नितेश थोरात, अजय पाटील, निरज पिसाळ हे शहारामध्ये गस्त घालत असताना दोन युवक रामलींग रोडलगत पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कार मध्ये बेकायादेशीपणे मांडूळ प्रजातीचा साप घेऊन थांबले असल्याची माहिती मिळाली होती. त्यांनतर पोलिसांनी सदर ठिकाणी जात संशयित असलेल्या स्विफ्ट कारची पाहणी केली असता त्या कारमध्ये दोन युवक मांडूळ साप घेऊन बसल्याचे दिसून आले. दरम्यान पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत त्यांच्या जवळील मांडूळ साप जप्त केला. पोलिसांनी देवदास ईमराज भोसले वय ५१ वर्ष रा. मुखई ता. शिरूर जि. पुणे व धनेश्वर दुर्यभान भोसले वय ३५ वर्ष, रा. गणेगाव खालसा ता. शिरूर जि. पुणे या दोघांवर वन्यजीव संरक्षण अधिनियम कलमानुसार गुन्हा दाखल केला.याबाबतची माहिती शिरुर वनविभागाचे वनपरीमंडळ अधिकारी गणेश पवार यांना देत जप्त केलेला मांडूळ साप त्यांच्या ताब्यात देण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण हे करत आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे घरेलू कामगार महिलांकडून स्वागत




पिंपरी । प्रतिनिधी

घरेलू कामगार हा महत्त्वाचा घटक असून घरेलू कामगारांचे हक्काचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक असणारा कायदा करा, याबाबत कायदेशीर नियमावली बनवण्यासाठी समिती स्थापन करण्याचे आणि सहा महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश सूर्यकांत आणि उज्वल भूयान यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला दिले. या निर्णयामुळे अनेक घरेलू कामगारांना लाभ होणार असून या निर्णयाचे आज घरेलू कामगारांनी एकमेकांना साखर देऊन स्वागत केले.

कष्टकरी संघर्ष महासंघ आणि कष्टकरी संघर्ष घरेलू कामगार महासंघातर्फे या निर्णयाचे चिंचवड येथे स्वागत करण्यात आले. यावेळी कामगार नेते काशिनाथ नखाते, महिलाध्यक्षा माधुरी जलमुलवार, मनीषा चंदनशिवे, मिरा कांबळे, वैशालि पवार, लता गोरे, सविता शिंदे, पूजा एडके, पुनम मस्के, सविता सुर्यवंशी, सुनिता पवार, अश्विनी हटके, लक्ष्मि मटके यांच्यासह घरेलु कामगार उपस्थित होते. घरेलू कामगार हा महत्त्वाचा घटक असूनही आजपर्यंत त्यांची शासन दरबारी उपेक्षाच झालेली आहे घरेलू कामगार हे कामगार श्रेणीत येतात. मात्र कामगार म्हणून हे त्यांना संबोधले जात नाही, अत्यंत कमी पगार, कामाचा दीर्घ वेळ आणि अनेक वेळा घरेलू कामगारांना चुकीची वागणूक मिळते. या कामगारांना कायद्याचे संरक्षण नसल्याने त्यांची हेळसांड होत असल्याचे स्पष्ट नमूद करत कायदा व अहवाल करण्याबाबत निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र राज्यातील घरेलू कामगार कायदा हा निष्प्रभ करण्यात आलेला असून त्याला निधी न देता सरकार घरेलू कामगारावरती अन्याय केला आहे. सन्मानधन हे सलग सहा वर्ष कामगारांना मिळाले पाहिजे. न्यायालयीन आदेशाचे पालन करत लगेच त्वरित त्यांच्या हिताचा कायदा करावा. असे काशिनाथ नखाते यांनी म्हटले आहे.

# पुण्यात जीबीएसचा आणखी एक बळी; राज्यातील मृतांची संख्या चारवर



पुणे । प्रतिनिधी

पुण्यासह राज्याची चिंता वाढली आहे. पुणे शहरात गुलेन बॅरी सिंड्रोम च्या आणखी एका रूग्णाचा मृत्यू झाला आहे. पुण्यात जीबीएस बाधित रुग्णाचा तिसऱ्या रुग्णाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पुण्यातील नांदेडगाव परिसरातील ६५ वर्षीय नागरिकाचा मृत्यू झाला आहे. या रूग्णावरती मागील १५ दिवसांपासून ससून रुग्णालयात उपचार सुरू होते. पुण्यातील नांदेडगावात अनेक रुग्ण हे जीबीएस बाधित आहेत, त्यातील हा एक रुग्ण होता. पुण्यातला तिसरा आणि राज्यातला चौथ्या जीबीएस बाधित रुग्णाचा मृत्यू झाला झाल्याने आता चिंता वाढली आहे. तर पुणे शहरामध्ये नांदेडगाव, सिंहगड रस्ता परिसर या ठिकाणी जास्त प्रमाणामध्ये जीबीएस बाधित रूग्ण आढळून आले आहेत.

नांदेड गावातली नागरिकाला ब्लड प्रेशरचा त्रास होता. त्यामुळे काही दिवस पुण्यातील खासगी रुग्ण्यालयात उचार सुरु होते. प्रकृती अजून खराब झाल्याने त्यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आलं. ससून रुग्णालयात उपचार सुरू असताना नागरिकाचा मृत्यू झाला आहे.

सोलापुरात एक, पुण्यात दोन तर पिंपरी चिंचवडमध्ये एक मृत्यू

पुण्यातून सोलापुरला आपल्या गावी गेलेल्या एका जीबीएस बाधित रूग्णाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर पुण्यातील सिंहगड परिसरात राहणाऱ्या ५६ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला होता. मृत महिला रूग्ण कॅन्सरग्रस्त होती. १५ जानेवारी रोजी ससून रुग्णालयात त्या महिलेला दाखल करण्यात आले होते. उपचारांच्या दरम्यान महिलेचा मृत्यू झाला होता. तर काल (गुरूवारी, ता- ३०) सकाळी पिंपरी चिंचवड शहरामध्ये जीबीएसचा पहिला रुग्ण दगावला आहे. ३६ वर्षीय हा तरुण पिंपळे गुरवचा रहिवासी होता. २१ जानेवारीला तो पालिकेच्या वायसीएम रुग्णालयात दाखल झाला. मात्र उपचारासाठी आला तेव्हापासूनच तो व्हेंटिलेटरवर होता. गेली आठ दिवस त्याला वाचवण्यासाठी डॉक्टरांनी बरेच प्रयत्न केले, मात्र काल त्या तरूणाचा मृत्यू झाला आहे. शहरात आत्तापर्यंत जीबीएसचे १३ रुग्ण आढळले आहेत, पिंपरी चिंचवड शहरामध्ये हा पहिला बळी ठरला आहे.